MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष तेवीसावे / अंक २ / फेब्रुवारी २०२२

## संपादकीय

### ऑनलाइन शिक्षण

ऑनलाइन शिक्षण हा एक इंग्रजी आणि एक मराठी शब्द वापरून तयार केलेला जोडशब्द सध्या फारच प्रचलित झालेला आहे. विशेषतः करोना महामारीच्या काळात जेव्हा सर्व शाळा आणि महाविद्यालये बंद करण्यात आली तेव्हा याशिवाय शिक्षणाला कोणताही पर्याय उपलब्ध नव्हता. त्यामुळे शिक्षकांनी ऑनलाइन शिकवावे आणि विद्यार्थ्यांनी ते समजून घ्यावे अशी एक पद्धत रूढ झाली. यासाठी सोयीचे व्हावे म्हणून काही ऑनलाइन प्लॅटफॉर्म निर्माण करण्यात आले. सुरुवातीला त्यांची विश्वासार्हता जरा कमीच होती. परंतु कालांतराने ती सुधारत गेली. आजच्या घडीला अनेक प्लॅटफॉर्म उपलब्ध झाले आहेत. त्यामध्ये झूमचा वापर सर्वात जास्त होताना दिसतो. त्याच बरोबर गुगल मीट, मायक्रोसोफ्ट टिम, वेबेक्स असेही काही प्लॅटफॉर्म विकसित करण्यात आलेले आहेत. विशेष हे की, हे प्लॅटफोर्म अतिशय अल्प दरात उपलब्ध करून दिले जातात. मर्यादित कालावधीसाठी अणि मर्यादित सभासदांसाठी त्यांचा वापर करायचा असेल तर ते विनाशुल्क वापरता येतात.

विद्यार्थी पुढे बसलेले असताना त्यांना शिकवण्याची सवय शिक्षकांना आहे. अचानकपणे मुले पुढे नसताना शिकवण्याची जबाबदारी त्यांच्यावर आली. या अडचणींवर मात करणे अनेक शिक्षकांना अवघड गेले. त्याहीपेक्षा अडचणीची बाब म्हणजे या नवीन तंत्राचा वापर कसा करायचा याचे कसलेही प्रशिक्षण शिक्षकांना मिळाले नाही. त्यांनी एकमेकांची मदत घेऊन आणि स्वत: धडपड करून ऑनलाइन प्लॅटफॉर्म वापरण्याचे कौशल्य आत्मसात केले.त्यांचा उपयोग करून महामारीच्या काळात शिक्षणाचे कार्य त्यानी सुरू ठेवले. त्यासाठी शिक्षक मंडळी अभिनंदनास पात्र आहेत. असे असले तरी अध्ययन अध्यापनाचे काम समाधानकारक पार पडले असे म्हणता येणार नाही. याचे एक कारण म्हणजे शिक्षकांचे नवीन माध्यमाविषयी असलेले अल्पज्ञान हे होय. या माध्यामाचा प्रभावीपणे कसा वापर करावा याचा त्यांना सराव नव्हता. याहीपेक्षा अडचणीची बाब दुसऱ्या बाजूला होती. शिक्षकांनी ऑनलाईन पद्धतीने दिलेली माहिती आत्मसात करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची होती. त्यासाठी योग्य तांत्रीक सुविधा उपलब्ध असणे आवश्यक होते. इथे अनेक विद्यार्थ्यांची अडचण झाली. ग्रामीण भागातील अनेक मुलांना संगणक किंवा स्मार्टफोन उपलब्ध होऊ शकले नाहीत. ज्यांना या सोयी उपलब्ध होत्या त्यांना या तंत्राचा

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

शिक्षणासाठी कसा उपयोग करावा याचे ज्ञान नव्हते. त्यांनादेखील शिक्षक आपल्यापुढे उभे राहून शिकवायचे तेव्हा समजून घेण्याचा अनुभव होता. त्याऐवजी शिक्षक कुठेतरी बसलेले आहेत आणि पडद्यावर पाठ्यपुस्तकातील माहिती येत आहे यावरून कसे शिकावे याचा कसलाही अनुभव त्यांना नव्हता. प्रत्यक्ष सहभागी झाल्याशिवाय किंवा करून पाहिल्याशिवाय आपल्याला विषयाचे आकलन होत नाही. विशेषतः विज्ञानाच्या बाबतीत तर ही बाब फारच महत्त्वाची ठरते. ऑनलाईन शिक्षणात या बाबींचा अभाव असतो. अशा अनेक अडचणींवर मात करत शाळा आणि महाविद्यालयाचे शिक्षण सुरू ठेवण्यात आले. आता सध्या महामारीचा प्रकोप कमी झाल्यामुळे शिक्षण संस्था पुन्हा गजबजू लागल्या आहेत. त्यामुळे मूळच्या पद्धतीने अध्ययन अध्यापन होऊ लागेल अशी अशा करू या.

तंत्रज्ञानाचा उपयोग करून दूरस्थ शिक्षण देण्याची संकल्पना तशी नवीन नाही. जेव्हा तंत्रज्ञानाचा विकास झाला तेव्हापासूनच त्यांचा उपयोग करून अध्यापन करण्याचे प्रयत्न सुरू झाले. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला रेडिओ उपलब्ध झाले. तेव्हा रेडिओच्या माध्यमातून अनेक शैक्षणिक कार्यक्रम राबवण्यात आले. रेडिओच्या नंतर आले टेलिव्हिजन. इंग्लंडच्या मुक्त विद्यापीठाने टेलिव्हिजनचा अतिशय प्रभावीपणे उपयोग करून घेतला. त्यांनी बी बी सी बरोबर करार करून विशेष शैक्षणिक कार्यक्रम करून घेतले आणि ठराविक वेळेस ते टेलिव्हिजनवर दाखवले. जेव्हा वेबसाइट्सचा विकास झाला तेव्हा माहिती पाहिजे तेव्हा मिळू लागली. म्हणून त्यांचाही उपयोग ज्ञान मिळवण्यासाठी होऊ लागला. कोणत्याही माध्यमाची उपयुक्तता हे आपण त्याचा कसा उपयोग करून घेतो यावर ठरते. भारतात खरेतर टेलिव्हिजनचा प्रसार हे ज्ञानदानाचे माध्यम म्हणून करण्यात आले. प्रत्यक्षात मात्र ते आता एक मनोरंजनाचे साधन झाले आहे. अर्थात टेलिव्हिजनचा ज्ञानप्राप्तीसाठी वापर होतो, नाही असे नाही. परंतु अशा लोकांची संख्या फारच कमी आहे.

ऑनलाइन प्रणालीचा शाळकरी विद्यार्थ्यांना किती फायदा झाला हे सांगणे कठीण आहे. परंतु महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी त्यांचा चांगला उपयोग करून घेतला असे दिसते. त्याहीपेक्षा विज्ञान प्रसाराच्या क्षेत्रात जी मंडळी आहेत त्यांनी या संधीचा खूपच चांगला उपयोग करून घेतला. जागतिक स्तरावर विज्ञान प्रसाराचे कार्य करणारी एक संघटना आहे. त्याने ऑनलाइन पद्धतीने अनेक कार्यक्रम केले. ते आम्हाला घरी बसल्या पाहता आले. भारतामध्ये विज्ञान प्रसार नावाची एक शासकीय संस्था आहे. त्या संस्थेने पुढाकार घेऊन खूप चांगले कार्यक्रम आयोजित केले. उदाहरणच द्यायचे झाले तर रामानुजन यात्रेचे देता येईल. २०२० हे वर्ष रामानुजन या महान गणितज्ज्ञाच्या मृत्यू शताब्दीचे वर्ष होते. या निमित्ताने रामानुजनच्या कामाची माहिती देण्याचा प्रयत्न या संस्थेने केला. त्यांच्या कामाशी संबंधित असलेल्या लोकांशी संपर्क साधून त्यांची ऑनलाईन व्याख्याने आयोजित केली. अमेरिकेच्या पेंनसिलवानिया विद्यापीठात काम करणारे प्राध्यापक जॉर्ज अँड्रूज यांनी रामानुजनच्या हरवलेल्या वह्या शोधून त्यावर संशोधन केले आणि पाच पुस्तके प्रकाशित केली. त्यांचे व्याख्यान आम्हाला घरबसल्या ऐकता आले. हा ऑनलाइन शिक्षणाचा मोठाच फायदा म्हणावा लागेल. महामारी संपल्यानंतर शाळा आणि महाविद्यालयाचे ऑनलाइन वर्ग बंद होतील. तरीही अनेक संस्थानी सुरू केलेले ऑनलाइन उद्‌बोधन सत्र सुरूच राहील असे वाटते. त्याचा उपयोग ज्ञानदानासाठी अखंड होत राहील अशी अशा आपण बाळगू या.

**- डॉ. सुधाकर आगरकर**

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

**वर्ष तेवीसावे/अंक २/फेब्रुवारी २०२२**



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २६ वे/अंक ८ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**


## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | ॐ दत्तात्रेय नमः | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | ३ |
| ३) | डिजिटल रुपया क्रिप्टो करन्सी नाही | चन्द्रशेखर टिळक | ८ |
| ४) | स्वामी विवेकानंद जयंती | संकेत कुलकर्णी | १० |
| ५) | आवर्जून वाचावं असं काही : रिचर्ड एल्मनचे 'फोर डब्लिनर्स' | डॉ. आनंद कुलकर्णी | १२ |
| ६) | हयवदन | डॉ. रंजन गर्गे | १७ |
| ७) | जपानची ओळख | गौरी अंबाजी परब | २७ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | २९ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२
  या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# ॐ दत्तात्रेय नमः

**(भाग ३)**

*ब्रह्मा, विष्णू व भगवान शिवाचे रूप मानल्या गेलेल्या दत्तात्रेय या देवतेविषयी माहिती देणारा लेख– संपादक*

गाणगापूर हे दत्तात्रेयांचे पवित्र ठिकाण कर्नाटक जिल्ह्यातील गुलबर्गा या जिल्ह्यात आहे. हे पवित्र तीर्थस्थळ भीमा व अमरजा या नद्यांच्या संगमावर असून. हे ठिकाण नृसिंहसरस्वतींच्या तब्बल चोवीस वर्षांच्या (इसवी सन सुमारे १४३५ ते इसवी सन सुमारे १४५८) वास्तव्याने पुनीत झाले आहे. गाणगापूरला इतरही अनेक मंदिरे व मठ आहेत. येथे देखील नृसिंहसरस्वतींनी आपल्या निर्गुण पादुकांची स्थापना केली. येथे भक्तगण त्यांच्या पादुकांचे दर्शन घेण्यासाठी जात असतात. येथे नृसिंहसरस्वतींनी चिंतामणी, तसेच त्रिमुखी दत्तात्रेयांच्या मूर्तीची स्थापना केली अशी माहिती आपणास मिळते. चिंतामणी हा आपल्या मनातील सर्व मनोकामना पूर्ण करणारा मौल्यवान खडा असल्याची हिंदू धर्मात मान्यता आहे. चिंतामणी बाबतची एक पौराणिक कथा पुढीलप्रमाणे आहे– एकदा गण नामक दुष्ट राजकुमार वनात आपल्या सवंगड्यांसह शिकारीसाठी जातो. या राजकुमाराची वृत्ती सामान्यजनांना, तसेच ऋषी–मुनींना त्रास देण्याची असते. तो जेव्हा वनात शिकारीसाठी जातो तेव्हा कपिल मुनींच्या आश्रमाजवळ पोहोचतो. त्यावेळी कपिल मुनी गण राजकुमाराला व त्याच्या मित्रांना भोजन करण्याची विनंती करतात. परंतु गण हा राजकुमार कपिल मुनींच्या आश्रमाची अवहेलना करतो व म्हणतो की, त्यांच्यासारखा वैरागी ऋषी राजकुमार व त्याच्या एवढ्या मित्रांना जेवण कसे चालू शकेल. तेव्हा कपिल मुनी आपल्याकडील चिंतामणीची पूजा करतात व तात्काळ राजकुमार व त्याच्या साथीदारांना पुरेल एवढे भोजन तयार होते. भोजनानंतर गण कपिल मुनींना त्यांच्याकडील चिंतामणी मागतो. परंतु कपिल मुनी गणासारख्या दुष्टाला चिंतामणी देण्यास नकार देतात तेव्हा गण कपिल मुनींकडील चिंतामणी बळजबरीने हस्तगत करतो. त्यावेळेस कपिल मुनी विघ्नहर्ता असलेल्या गणपतीची आराधना करतात. त्यानंतर गणपती तेथे प्रकट होतो व गणाच्या सैन्याचा पराभव करून आपल्या परशूच्या सहाय्याने गणाचा देखील वध करतो. हे सगळे घडल्यावर गणाचा पिता अभिजित राजा तेथे येतो व चिंतामणी गणपतीला देऊन आपल्या पुत्राच्या जीवनदानाची यातना करतो. गणपती चिंतामणी कपिल मुनींना परत देऊन टाकतो व अभिजित राजाला वरदान देतो. पुण्यातील थेऊर येथील चिंतामणी गणपती मंदिर फार प्रसिद्ध आहे. हे अष्टविनायकांपैकी एक मानले जाते. गणपतीला काही भक्तगण चिंतामणी असेदेखील म्हणतात. थेऊर हे ठिकाण पूर्वापारपासून गाणपत्य पंथीयांचे पवित्र स्थळ मानले जाते. गाणपत्य पंथ गणपतीला सर्वश्रेष्ठ देव मानतो. थेऊरच्या या गणपती मंदिराला पेशवेकाळात फार महत्त्व होते. गणपती हे पेशव्यांचे कुलदैवत होते. थोरले माधवराव पेशवे थेऊरच्या गणपतीला नियमीतपणे जात असत असे दाखले आपणास सापडतात. तसेच चिमाजी आप्पांनी वसईच्या मोहिमेवरून परतताना पोर्तुगीजांकडून युरोपियन पद्धतीची एक मोठी घंटा आणतात. ती घंटा त्यांनी थेऊरच्या गणपती मंदिरात लावण्यासाठी दिली होती असे म्हणतात. या ठिकाणाविषयी सांगितली जाणारी अजून एक कथा अशी की, येथे आपले अस्थिर चित्त वा मन स्थिर करण्यासाठी येथे ध्यान करतात व त्यांना गणपती प्रसन्न

झाल्यामुळे त्यांच्या 'चिंता' नष्ट होतात व त्यांचे मन स्थिर होते. त्यामुळे देखील गणपतीला 'चिंतामणी' असे म्हटले जाते. असो. तर आपला मुळ मुद्दा असा होता की, गाणगापूरला नृसिंहसरस्वती चिंतामणीच्या मूर्तीची देखील स्थापना करतात व येथे दत्तगुरूंच्या पादुकांचे पूजन केले जाते.

गिरनार पर्वत गुजरातमधील सौराष्ट्र प्रांतात असून ती एक पवित्र देवभूमी मानली जाते. गिरनारचे वैशिष्ट्य म्हणजे या पर्वतावर जैन धर्मीय बांधवांचे देखील मंदिर आहे. गिरनारमध्ये अनेक हिंदू देव-देवतांची मंदिरे आहेत. येथील एका पर्वतावर दत्तात्रेयांचे मंदिर असून या मंदिरात जाण्यासाठी भक्तगणांना दहा हजार पायऱ्या चढून जाव्या लागतात. येथील मंदिरात देखील दत्तगुरूंच्या पादुका असून त्यांचे दर्शन घेण्यासाठी भारतभरातून भक्तगण येत असतात. गिरनार पर्वतात दत्तात्रेयांचा नित्य निवास असतो असे मानले जाते. येथेच महान दत्तभक्त गोरक्षनाथाचे भगवान दत्तात्रेयांनी गर्वहरण केले होते अशी कथा सांगितली जाते.

अशाप्रकारे संन्यस्तवृत्ती असलेल्या दत्तात्रेयांच्या पायात पादुका आढळतात. अर्थात आपण वर विवेचन केलेले आहेच की, साधारणपणे साधू-संत, संन्यासी तसेच ऋषी-मुनी खडावा घालत असतात. भगवान दत्तात्रेय देखील वैरागी वृत्तीचे योगी असल्यामुळे त्यांना पादुका प्रिय आहेत असे म्हणणे वावगे ठरू नये. त्यामुळेच दत्तसंप्रदायात पादुकांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.

दत्तगुरूंचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्यासोबत श्वान म्हणजेच कुत्री असतात. कुत्र्यांचा संदर्भ वेदांमध्ये देखील आलेला असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. संस्कृतमध्ये कुत्र्याला श्वान असे संबोधतात. अनेक हिंदू पौराणिक कथांमध्येदेखील श्वानाचा संदर्भ येतो. दत्तात्रेयांसोबत साधारणपणे चार श्वान असतात. अभ्यासकांच्या मते हे चार श्वान म्हणजे चार वेदांचे (ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद) प्रतीक होत. श्वान हे भगवान शिवाचा अंश मानला गेलेल्या काळभैरवाचे वाहन समजले जाते. सरम ही हिंदू धर्माप्रमाणे सर्व श्वानांची माता समजली जाते. देवांच्या श्वानांनी इंद्राला त्याच्या दैवी व पवित्र गायी परत मिळवून देण्यात मदत केली होती. महाभारतात श्वानाविषयी एक अशी कथा आहे की, युद्धिष्ठिर पांडवांसह महाभारताच्या युद्धानंतर जेव्हा प्रायश्चित्त करत असतो तेव्हा त्यांच्या मागे एक श्वान असतो. युद्धिष्ठिर स्वर्गात जातानादेखील तो श्वान त्याच्या मागे असतो. युद्धिष्ठिर त्या श्वानासोबतच स्वर्गात प्रवेश करील असा हट्ट धरतो. शेवटी युद्धिष्ठिरासोबत त्या श्वानालाही स्वर्गात प्रवेश द्यावा लागतो. तो श्वान म्हणजे साक्षात यम म्हणजेच धर्म असतो व तो युद्धिष्ठिर व इतर पांडव आपले प्रायश्चित धर्माप्रमाणे घेत आहेत की नाही हे पाहण्यासाठी सतत त्यांच्या मागे असतो अशा स्वरूपाची कथा सांगितली जाते. यमलोकाचे रक्षण चार श्वान करत असतात व या श्वानांना प्रत्येकी चार डोळे असतात असे हिंदू मानतात. श्वान म्हणजे भूलोक व मृत्युलोकामधील दुवा होय असेदेखील हिंदू मानतात त्यामुळेच पिंडदान करताना व श्राद्धाच्या वेळी कुत्र्यांना भोजन देण्याची हिंदूंची परंपरा आहे. असेही म्हटले जाते की, राहू व शनी सारख्या ग्रहांच्या प्रभावातून बाहेर पडण्यासाठी काळ्या रंगाच्या कुत्र्यांना जेवण घालणे इष्ट असे काही हिंदू मानतात. आपणास असे निदर्शनास येते की, हिंदू धर्मात प्राण्यांना खूप महत्त्व आहे. विविध देवतांचे वेगवेगळे प्राणी वाहन असल्याचे आपण वाचतो. काही देव व त्यांचे वाहन पुढीलप्रमाणे दर्शविले आहे- भगवान शिव- नंदी (वृषभ), दुर्गामाता- वाघ, कार्तिकेय- मोर, गणपती- उंदीर, भगवान विष्णू- गरूड, ब्रह्मदेव- हंस, इंद्र- ऐरावत (गज-हत्ती). आपण अगोदर उल्लेख केलेलाच आहे की, काळभैरवाचे वाहन श्वान आहे. श्वानाचा एक महत्त्वाचा गुण म्हणजे तो आपल्या मालकाशी वा अन्नदात्याशी शेवटपर्यंत एकनिष्ठ राहतो.

तसेच तो आपल्या मर्यादित क्षेत्राच्या बाहेर सहसा जात नाही. अगदी त्याचप्रमाणे दत्तगुरू आपणास श्वानाच्या माध्यमातून धर्म व नैतिकतेची बंधने पाळण्याचा आणि मानवी जीवनाच्या व क्षणभंगूर आयुष्याच्या मर्यादा ओळखून प्रेमाने व आनंदाने इतरांना मदत करून व देवांच्या नावाचा जप करून सुखी-समाधानी जीवन व्यतीत करून आनंदाने जगण्याचा संदेश देत असावेत असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

भगवान दत्तात्रेय पिवळे पितांबर नेमलेले असतात. तसेच त्यांना पिवळ्या रंगाचा नैवेद्य (पिवळी खिचडी, पिवळी डाळ तसेच इतर पिवळे अन्नपदार्थ) दाखविणे उचीत मानले जाते. पिवळ्या रंगाचे हिंदू धर्मात फार महत्त्व आहे. भगवान श्रीकृष्ण व गणपतीदेखील पिवळ्या रंगाची वस्त्रे परिधान करत अशी वर्णने आपणास वाचावयास मिळतात. पिवळा रंग हा ज्ञान व विद्वत्तेचे प्रतीक मानला जातो. भगवान विष्णुला ही पिवळा रंग आवडतो व त्याची वस्त्रेसुद्धा पिवळी असतात. हिंदू परंपरेत पिवळा रंग हा आनंद, शांती, ध्यान, मानसिक कुवत, तसेच बौद्धिक प्रगल्भतेचे प्रतीक मानला गेला आहे. पिवळ्या रंगाचे हिंदू संस्कृतीत एवढे महत्त्व आहे की, याला शुद्धतेचा, विजयाचा व शुद्ध चारित्र्याचा रंग म्हटलेले आहे. हिंदू धर्मातील साधू-संत सहसा पिवळी वस्त्र नेसताना आढळतात. अशाप्रकारे एवढ्या सद्गुणांचा प्रतीक असलेला पिवळा रंग भगवान दत्तात्रेयांना प्रिय आहे.

भगवान दत्तात्रेयांकडे डमरू असल्याचेही आपण पाहतो. डमरू हे वाद्य भगवान शिवाकडे असते. भगवान शिव नृत्य करत असताना (सहसा तांडव करत असताना) डमरूतून ध्वनी काढत असतात असे म्हटले जाते. डमरू हे एकप्रकारे विश्वाच्या निर्मितीचे (उत्पत्तीचे) तसेच विश्वाचा सतत विस्तार होत असल्याचे प्रतीक आहे असे काही हिंदू मानतात. तसेच डमरू हे आध्यात्मिक ध्वनी निघणारे वाद्य समजले जाते. त्यामुळेच भगवान दत्तात्रेयांकडे डमरू असते असे म्हणणे संयुक्तीक ठरेल.

संत तुकारामांनी आपल्या एका अभंगात दत्तगुरूंचे वर्णन 'माथा मोठे जटाभार' असे केले आहे. याचा अर्थ असा की, भगवान दत्तात्रेयांना जटा आहेत, म्हणजेच त्यांचे केस लांब आहेत व त्यांचा डोक्यावर अंबाडा आहे. जटांचा संबंध हा प्रामुख्याने भगवान शिवाची आहे. शिव शंकराच्या डोक्यावर देखील जटा आहेत. काही अभ्यासक असे म्हणतात की, जटा हे शांत चित्ताचे व एकाग्रतेचे प्रतिक आहे. एकप्रकारे हे चंचल मनाला व इंद्रियांना बांधून ठेवल्याचे वा त्यांच्यावर नियंत्रण ठेवल्याचे लक्षण आहे. भगवान शिवाने गंगा नदीचे स्वर्गातून पृथ्वीवर गंगावतरण होताना तिला आपल्या जपानमध्ये झेलले होते कारण गंगा नदी स्वर्गातून पृथ्वीवर येताना तिच्या वेगाने पृथ्वी दुभंगली असती त्यामुळे तिचा वेग कमी करण्यासाठी भगवान शिवाला तिला आपल्या जटांमध्ये झेलावे लागले. बऱ्याचशा हिंदूंची अशी धारणा आहे की, असे करून भगवान शिवाने गंगेच्या गर्वाला नियंत्रित केले होते. अनेक साधू-संतांच्या जटा असतात. प्रामुख्याने शैव पंथीय साधूंना जटा असल्याचे निदर्शनास येते. कुंभमेळ्यादरम्यान बरेचसे जटाधारी शैव साधू गोदावरी, शिप्रा व गंगा नदीत पवित्र स्नान करताना आढळतात. मानवी इतिहासाचा अभ्यास केल्यावर असे लक्षात येते की, जगातील सर्वच महत्त्वाच्या सभ्यतांमध्ये व धर्मांमध्ये जटांना महत्त्व आहे. त्यामुळे भगवान दत्तात्रेय हे सर्वसमावेशक असून त्यांनी आपल्या जटांच्या माध्यमातून मनावर व इंद्रियांवर नियंत्रण ठेऊन चित्तशांती साध्य करण्याचा व त्यायोगे मोक्षप्राप्तीसाठी प्रयत्न करण्याचा संदेश दिला आहे असे म्हणणे उचित ठरेल.

दत्तात्रेयांचा योगिराज असे म्हटले जाते. आपण योगाचा अर्थ समजावून घेण्याचा प्रयत्न केल्यास प्राचीन धर्मसाहित्यात योगाचा अर्थ आपल्या इंद्रियांवर संयम

मिळवून आपले मन एकाग्र करणे असा दिलेला आहे हे आपल्या लक्षात येते. हिंदू तत्त्वज्ञान आपणास असे सांगते की, नियमीत योगाभ्यास केल्याने व तो सफलपणे पूर्ण केल्यामुळे व्यक्तीला आत्मसाक्षात्कार होतो. मोक्ष मिळविण्यासाठी आत्मसाक्षात्कार होणे फार आवश्यक आहे. हिंदू तत्त्वज्ञान सांगते की, हे आयुष्य क्षणभंगूर असते व शरीर हे नाशवंत असते परंतु आत्मा अमर असतो व आत्मा परमात्म्यात विलीन झाल्यावर मनुष्य जन्म-मरणाच्या फेऱ्यातून मुक्त होतो व त्यास मोक्षप्राप्ती होते. मोक्ष मिळविल्यावर परमोच्च आनंदाची अनुभूती होते. काही लोक स्वर्गप्राप्ती झाल्यावर मोक्ष मिळतो असे म्हणतात. दत्तात्रेय हे योगिराज असल्यामुळे ते अखंडपणे ध्यान व तपश्चर्या करत असतात. ते सात्विकतेचे व ज्ञानाचे प्रतीक आहेत. भक्तगण असे मानतात की, आजही दत्तगुरू गिरनार पर्वतावर तपश्चर्या करत असतात. आपण दत्तात्रेयांची संत एकनाथांनी लिहिलेली आरती काळजीपूर्वक वाचून तिचा अर्थ लावल्यास दत्तगुरू हे भक्तांना जन्म-मरणाच्या फेऱ्यातून मुक्ती देऊन एकप्रकारे मोक्षप्राप्तीस मदत करतात हे लक्षात येते. एवढेच नव्हे तर, एकनाथ महाराज दत्तगुरूंच्या आरतीत म्हणतात की, 'आरती ओवाळितां हल्ली भवचिंता', याचा अर्थ असा की, दत्तगुरूंची आरती केल्यावर भवचिंता म्हणजेच एकप्रकारे संसाराची व क्षणभंगूर जीवनाच्या चिंतेचे दत्तगुरू हरण करतात म्हणजेच नष्ट करतात.

हिंदू धर्माच्या तत्त्वज्ञानाविषयी म्हटले तर हे तत्त्वज्ञान साधारणपणे सहा शाखांमध्ये विभागलेले आहे. धार्मिक तत्वज्ञानाच्या या सहा शाखांना एकत्रितरित्या 'षड्दर्शन' असे म्हणतात. येथे दर्शन या शब्दाचा अर्थ तत्त्वज्ञान असा आहे. ही षड्दर्शने पुढीलप्रमाणे आहेत- सांख्य, योग, न्याय, वैशेशिका, पूर्व मीमांसा, उत्तर मीमांसा (वेदांत). यापैकी योगाचा विचार केला तर पतंजलीची योगसूत्रे प्रसिद्ध आहेत. पतंजलीच्या योगसूत्रांना अष्टांग योग असेदेखील म्हणतात. कारण यात यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी या आठ तत्त्वांना महत्त्व दिलेले आहे. योगामध्ये चित्ताची एकाग्रता होणे अनिवार्य आहे. जर चित्ताची एकाग्रता होत नसेल तर तो खरा योगी नव्हे. पतंजलीच्या योगदर्शनाचा उद्देश कैवल्यप्राप्ती म्हणजेच मोक्षप्राप्ती होय. हिंदू तत्त्वज्ञानात योगाचे पुढीलप्रमाणे विविध मार्ग (योगमार्ग) सांगितले आहेत- ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तीयोग, राजयोग, हठयोग, लययोग, मंत्रयोग.

ज्ञानयोगामध्ये व्यक्ती आपल्या अस्तित्वाबाबत प्रश्न विचारून त्याची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करतो. या कामी व्यक्तीला गुरूची मदत लागते. यात व्यक्ती आत्म्याचा ब्रह्मतत्त्वाशी असलेला संबंध यावर चिंतन करते व ब्रह्मतत्त्व म्हणजेच सच्चिदानंद प्राप्त करण्याचा प्रयत्न करते असे अभ्यासक म्हणतात.

कर्मयोगाचे तत्त्वज्ञान थोडक्यात असे आहे की, व्यक्तीला कर्मापासून सुटका नाही. आपण जागृत, स्वप्न वा निद्रा या तिन्ही अवस्थांमध्ये कर्म करत असतो. मोक्षप्राप्तीसाठी चित्तशुद्ध असणे आवश्यक आहे व चित्तशुद्धीसाठी हिंसा, चोरी, परस्त्रीगमन, इत्यादी निषिद्ध कर्मे टाळून मन व इंद्रियांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक असते. मनुष्याने नैतिक कर्तव्ये कुठल्याही फळाची अपेक्षा न ठेवता केल्यावर त्याची चित्तशुद्धी होते व त्याला आत्मसाक्षात्कार होतो. आत्मसाक्षात्कार झालेल्या व्यक्ती संन्यास घेतात परंतु आपले समाजाप्रतीचे कर्तव्य पार पाडण्यासाठी व माता-पित्यांचे ऋण फेडण्यासाठी निषिद्ध कर्मे टाळून गृहस्थाश्रमी राहून नित्यपणे चांगली कर्मे करत राहणे व चित्तशुद्धी करणे म्हणजे कर्मयोग होय. कर्मयोगाचे सुरेख विवेचन श्रीकृष्णाने भगवदगीतेत केले आहे.

भक्तीयोगात परमेश्वराच्या भक्तीवर भर देण्यात आला आहे. भक्तीयोगात देवावर प्रेम करणे, देवाची आराधना

करणे, देवाची पूजा करणे, देवाचे नियमितपणे स्मरण करणे, देवाचे कीर्तन करणे, देवाच्या चरणांची पूजा करणे (आपण पाहिलेलेच आहे की, दत्तसंप्रदायात दत्तगुरूंच्या पादुकांच्या पूजनाला व दर्शनाला महत्त्व आहे) आदी गोष्टींवर भर देण्यात आला आहे. यात देवावर अतोनात प्रेम करणे व आपले चित्त देवाच्या प्रेमाने व भक्तीने भरून टाकणे अपेक्षित आहे. महाराष्ट्रातील साधू-संतांनी भक्तीमार्गाचा पुरस्कार केल्याचे आपल्या निदर्शनास येते. भक्तीयोग अंगिकारणे सर्वसामान्यांना सोपे आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

हठयोगामध्ये नाडी व शरीर शुद्ध करून समाधी प्राप्त करणे यावर भर देण्यात आला आहे. हठयोगात कुंडलीनी शक्ती जागृत करण्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कुंडलीनी शक्ती मुलाधार चक्राच्या वर व नाडीच्या खाली असते असे म्हटले जाते. प्राणायमाच्या मदतीने कुंडलीनी शक्तीला सुषुम्ना नाडीतून मस्तकापर्यंत नेल्यास समाधी लागून आत्म्याचा साक्षात्कार होतो असे हठयोगी म्हणतात. हठयोगात गुरूचे मार्गदर्शन आवश्यक असते. शास्त्रीय पद्धतीने योगासनं व प्राणायाम करणे यासाठी गुरूची शिक्षा व मार्गदर्शन महत्त्वाचे ठरते. सुषुम्ना नाडी सोबतच शरीरात इडा नाडी (डावी नाकपुडी हिला चंद्रनाडी असेदेखील म्हणतात) व पिंगला नाडी (उजवी नाकपुडी हिला सूर्यनाडी असे देखील म्हणतात) असते असे हठयोगी मानतात. नाथसंप्रदायातील गोसावी हठयोगीच होते. नाथ संप्रदाय दत्तभक्तीसाठी प्रसिद्ध आहे. गोरक्षनाथ तर निस्सीम दत्तभक्त होते व त्यांचे दत्तात्रेयांनी गिरनार पर्वतावर गर्वहरण करून त्यांना दर्शन दिले होते असे नाथ संप्रदायी म्हणतात. भगवान दत्तात्रेय सुद्धा योगिराज होते व सर्व प्रकारचे योग त्यांच्या ठायी होते.

लययोगात ध्यानाभ्यासाच्या माध्यमातून मन शांत करणे व मनाला एकाग्र करणे म्हणजेच 'सहजा' वा 'उन्मनी' स्थिती प्राप्त करणे अपेक्षित आहे.

मंत्रयोगामध्ये प्राणायाम करताना आपल्या इष्ट देवतेचा मंत्र वा सोऽहं मंत्र जपणे अपेक्षित असते. अशाप्रकारे इष्ट प्राणायाम करत असताना मंत्राचा जप करून चित्ताची एकाग्रता साधणे म्हणजेच मंत्रयोग होय.

एकंदरीत आपण योगदर्शनाविषयी थोडक्यात सांगावयाचे झाले तर यात चित्तशुद्धीवर भर देण्यात आला आहे व ही चित्तशुद्धी योगसाधनेच्या माध्यमातून प्राप्त होते. भगवान दत्तात्रेयांना योगिराज याच दृष्टीने म्हटले गेले आहे की, त्यांना योगविद्या वश होती व ते एक महान योगी होते, नव्हे ते योगिराज होते. त्यांनी एकप्रकारे आपल्या भक्तांना योग साधनेच्या माध्यमातून समाधीकडे व त्यातून मोक्षप्राप्तीकडे जाण्याचा मार्ग दाखविला असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

**- सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email : subhashinscotland@gmail.com

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

# डिजिटल रुपया क्रिप्टो करन्सी नाही

*रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ब्लॉक-चेन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून डिजिटल रुपया निर्माण करणार आहे. 'डिजिटल रुपया' संकल्पनेची माहिती या लेखात विशद केली आहे - संपादक*

२०२२- २३ या आर्थिक वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री माननीय श्रीमती निर्मला सीतारामन यांनी संसदेला १ फेब्रुवारी २०२२ रोजी सादर केला. त्यात येत्या आर्थिक वर्षात आपल्या देशाची मध्यवर्ती बँक रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ब्लॉक-चेन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून डिजिटल रुपया निर्माण करेल अशी घोषणा करण्यात आली आहे.

तेंव्हापासून अनेक ठिकाणी हा डिजिटल रुपया म्हणजे आपले बिट-कॉइन किंवा क्रिप्टो करन्सी अशी चर्चा होत आहे. म्हणून हा शब्द- प्रपंच !

डिजिटल रुपया म्हणजे बिट-कॉइन नाही.

डिजिटल रुपया म्हणजे क्रिप्टो-करन्सी नाही.

खरं म्हणजे, डिजिटल रुपयाला बिट-कॉइन असे म्हणणे किंवा मानणे हे आपणच आपल्या सार्वभौम देशाचा, त्याच्या कायद्याने जन्माला आलेल्या आणि त्यानुसार कारभार करत असलेल्या देशाच्या मध्यवर्ती बँकेचा (रिझर्व्ह बँकेचा), आणि आपल्या देशाचे अधिकृत चलन असणाऱ्या रुपयाचा अपमान करण्यासारखे आहे.

त्याबाबत एखादाजण कायदेशीर कारवाई करू शकतो का हे बघण्याजोगे ठरेल.

केवळ या भीतीपोटी किंवा धाकापोटी एखाद्याने येऊ घातलेल्या डिजिटल रुपयाला क्रिप्टो-करन्सी किंवा बिट-कॉइन, म्हणू नाही असे नाही. तर असे म्हणणे संकल्पनात्मक आणि व्यावहारिक दृष्टीनेही चुकीचेच आहे.

असे म्हणण्याचे पहिले महत्त्वाचे कारण म्हणजे आजमितीला जागतिक आर्थिक वातावरणात सुमारे १७५ विविध नावांच्या आणि प्रकारच्या क्रिप्टो- करन्सी अस्तित्वात आहेत. बिट-कॉइन ही त्यापैकी एक आहे. एकमेव नाही. येऊ घातलेला किंवा प्रस्तावित डिजिटल रुपया असा अनेक स्वरूपात येण्याची सुतरामही शक्यता नाही. तो एकमेव असेल.

याबाबतचे दुसरे कारण म्हणजे, क्रिप्टो-करन्सी सैद्धांतिक दृष्ट्या तुमच्या-माझ्या सारख्या खाजगी व्यक्तीही निर्माण करू शकतात. आपले रुपया हे चलन तसे नाही. ते खाजगी व्यक्ती निर्माण करू शकत नाहीत. केवळ प्रस्तावित डिजिटल रुपयाच नव्हे; तर सध्या अस्तिवात असलेले आणि यानंतरही येणारे रुपयाच्या स्वरूपातील चलन केंद्र सरकारच्या विनंतिनुसार रिझर्व्ह बँक निर्माण करते. ते कोणतीही खाजगी व्यक्ती निर्माण करू शकत नाही. करूच शकणार नाही.

तिसरे कारण म्हणजे क्रिप्टो- करन्सीचे मूल्य बाजारातील त्याच्या मागणी- पुरवठ्यावर ठरते. शेअरबाजारात शेअर्सचे भाव ठरतात त्याप्रमाणे क्रिप्टो-करन्सीचे मूल्य ठरते. डिजिटल रुपया तसा नाही.

चौथे कारण म्हणजे क्रिप्टो- करन्सिना कोणतेही आधारभूत तत्त्व नाही. त्याची निर्मिती - अस्तित्व- चलनवलन - मूल्यांकन हे एका अर्थाने निव्वळ

संगणकीय खेळ आहे. डिजिटल रुपया तसा नाही. त्याला आपल्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा पाया किंवा आधार आहे. जी मूल्यांकन तत्त्वे आपल्या सध्याच्या कागदी स्वरूपातील रुपयाच्या मागे आधार म्हणून आहेत तीच आधारभूत तत्त्वे प्रस्तावित डिजिटल रुपयाचीही आधार आहेत.

पाचवे कारण म्हणजे क्रिप्टो-करन्सी हे गुंतवणुकीचे साधन (Investment Product) आहे. खरं म्हणजे, सध्यातरी ते सट्टेबाजांनी उचलून धरलेले जुगारी खेळणे ठरले आहे. याउलट प्रस्तावित डिजिटल रुपया हे व्यवहार पूर्ती करताना द्यावयाच्या पैशांचे एक रूप किंवा माध्यम आहे. जसे शेअरबाजारात गुंतवणूक करत असताना एखादा भारतीय गुंतवणूकदार त्याच्याजवळ असणारे शेअर्स कागदी प्रमाणपत्रांच्या (फिजिकल शेअर सर्टिफिकेट) स्वरूपातही सांभाळू शकतो, किंवा डिमटेरियलाइज स्वरूपातही सांभाळू शकतो तसेच डिजिटल रुपया प्रत्यक्षपणे अस्तित्वात आल्यावर आपल्याजवलील रोकड रक्कम आपण सध्याप्रमाणे कागदी नोटांच्या स्वरूपातही सांभाळू शकू आणि / किंवा प्रस्तावित डिजिटल स्वरूपातही सांभाळू शकू. थोडक्यात म्हणजे, डिजिटल रुपया हे गुंतवणुकीचे साधन नाही. सट्टेबाजीचे आधुनिक खेळणे तर नाहीच नाही. डिजिटल रुपया फक्त विनिमयाचे साधन आहे.

अगदी नेमक्या शब्दांत सांगायचे तर सध्याचा कागदी रुपया आणि प्रस्तावित डिजिटल रुपया या दोन्हीत सैद्धांतिक स्वरूपाचा काहीही फरक नाही. फरक आहे तो फक्त प्रत्यक्ष कागदी आणि आभासी असण्याचा आहे. हे एखाद्या व्यक्तीने अंगावरचे कपडे किंवा वस्त्रे बदलण्या सारखे आहे. दिसतात ते कपडे बदलले म्हणून असते ती व्यक्ती बदलत नाही. तसेच डिजिटल रुपयाचे आहे.

त्यामुळे या अर्थसंकल्पात डिजिटल रुपयाची घोषणा झाल्यावर काही वर्तुळात डिजिटल रुपया ही संभाव्य डिमोनिटायझेशनची नांदी आहे अशी जी चर्चा सुरू झाली आहे ती निव्वळ निरर्थक आणि पूर्णपणे बिन-बुडाची आहे.

त्याचबरोबर डिजिटल रूपयाबाबत अशीही चर्चा आहे की, त्यांतून काळ्या पैशाला आणि महागाईला आळा बसेल. अशी चर्चा म्हणजे तर निव्वळ भाबडेपणा आहे. जर कागदी रुपया आणि डिजिटल रुपया यांच्यात जर काही मूलभूत सैद्धांतिक स्वरूपाचा काहीही फरक नाही तर एक दुसऱ्यापेक्षा काहीतरी वेगळे कसे वागेल? दिसण्याच्या स्वरूपात असणाऱ्या अंगभूत फरकाने काय फरक पडेल तेवढाच फरक ! त्याच्याशी संबंधित तांत्रिक बाबी एकदा अंगवळणी पडल्या की तेही जाणवणार नाही.

डिजिटल रुपयाला क्रिप्टो-करन्सी म्हणणे पूर्णपणे चुकीचे असण्याचे सहावे कारण म्हणजे आजमितीस तरी क्रिप्टो-करन्सी हे कोणत्याही देशाचे अधिकृत चलन नाही. डिजिटल रुपया हे अस्तित्वात आल्या दिवसापासून आपल्या देशाचे अधिकृत चलन असेल.

याबाबतचे सातवे कारण म्हणजे क्रिप्टो- करन्सी हे विनिमयाचे साधन म्हणून कुठे वापरता येईल हे पूर्णपणे त्या दोन व्यक्तींवर अवलंबून असते. त्या आणि तशा प्रकारच्या व्यवहारात सरकारचा काडीचाही संबंध नाही. त्यात काहीही अडचण आल्यास संबंधित सरकार किंवा मध्यवर्ती बँक हस्तक्षेप करत नाही. असा प्रकार डिजिटल रुपया बाबत नाही.

त्यामुळे डिजिटल रुपया ही क्रिप्टो-करन्सी नाही. त्यामुळे डिजिटल रुपया बिट-कॉइन असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

(पृष्ठ क्र.११ वर)

---

आयुष्य हे सर्कसमधल्या जोकर सारखं झालंय, कितीही दु:खी असेल तरी जगासमोर हसावंच लागतं.

# स्वामी विवेकानंद जयंती

*भारतीय संस्कृतीची ओळख करून देण्यासाठी स्वामी विवेकानंदांनी विविध देशांचे दौरे केले. त्या दौऱ्यांचा आढावा या लेखात घेतला आहे - संपादक*

१२ जानेवारी १५९ वी जयंती आहे एका नरेंद्राची - नरेंद्रनाथ दत्त - स्वामी विवेकानंदांची!



**स्वामीजी १८९६ मध्ये लंडनमध्ये आले असताना, तिथे आल्फ्रेड एलिस नावाच्या फोटोग्राफरने त्यांचा काढलेला फोटो**

कलकत्त्याला जन्मलेल्या स्वामीजींची जगभरात कीर्ती झाली ती ११ सप्टेंबर १८९३ रोजी अमेरिकेतील शिकागो शहरात भरलेल्या सर्वधर्मीय परिषदेमुळे हे तर सर्वश्रुत आहेच. तेथे त्यांनी, 'अमेरिकेतील माझ्या बंधू आणि भगिनींनो' अशी भाषणास सुरुवात केली आणि सभेसाठी जमलेल्या सुमारे सात हजार लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. ह्याच सभेला हेन्रिएटा म्युलर नावाच्या एक ब्रिटिश बाईही उपस्थित होत्या. त्या थिऑसॉफीवर व्याख्यान द्यायला तिथे आलेल्या होत्या. त्या विवेकानंदांचे वेदान्तावर व भारतीय संस्कृतीवरचे विचार ऐकून खूप प्रभावित झाल्या. ह्या म्युलर बाई वयाने मोठ्या होत्या, पण सुधारित विचारांच्या होत्या. बाईंनी त्या काळात अक्षोयकुमार घोष नावाच्या भारतीय मुलाला दत्तकही घेतलेले होते. तोही विवेकानंदांचा चाहता होता. अक्षोयला सांगून म्युलरबाईंनी विवेकानंदांना इंग्लंडमध्ये यायचे आमंत्रण दिले. त्यानुसार स्वामीजी अमेरिकावारी आवरताना न्यू यॉर्कवरून एसएस तुरीन नावाच्या बोटीने पॅरीसला आणि तिथून पुढे १० सप्टेंबर १८९५ रोजी लंडनला आले. दोन अडीच महिने इथे वेगवेगळ्या ठिकाणी मुक्काम करत आणि भारतीय संस्कृतीबद्दल प्रवचनं देत २७ नोव्हेंबर १८९५ रोजी ते पुन्हा आरएमएस ब्रिटानीक नावाच्या बोटीने न्यू यॉर्कला निघून गेले.

१५ एप्रिल १८९६ रोजी एसएस जमनिक नावाच्या बोटीने स्वामीजी न्यू यॉर्कवरून पुन्हा लिव्हरपूलला आले. तिथून पुन्हा वेगवेगळ्या ठिकाणी प्रवचनं देत मे १८९६ मध्ये ते लंडनला आले. तिथेच १३ जुलै १८९६ रोजी त्यांच्या राजयोगावरच्या पुस्तकाचे प्रकाशन झाले. १९ जुलै १८९६ रोजी स्वामीजी युरोप दौऱ्यावर निघून गेले. सुमारे दोन महिन्यांनी यशस्वी युरोप दौरा करून ते १७ सप्टेंबर १८९६ मध्ये पुन्हा लंडनला परत आले. सुमारे तीन महिने लंडनमध्ये काढून १६ डिसेंबर १८९६ रोजी ते इटलीमार्गे भारतात निघून गेले.

ह्यानंतर अजून एकदा स्वामीजी इंग्लंडमध्ये आले. २० जून १८९९ रोजी कलकत्त्यावरून निघालेल्या एसएस गोलकोंडा बोटीने निघून ३१ जुलै १८९९ रोजी स्वामीजी लंडनला पोहोचले. सुमारे दोन आठवडे मुक्काम करून ते

१७ ऑगस्ट १८९९ रोजी एसएस नुमिडीयन नावाच्या बोटीने स्वामीजी ग्लासगोवरून न्यू यॉर्कला निघून गेले.




**लंडनमधील सेंट जॉर्जेस ड्राईव्हवरील ज्या घरात स्वामीजी १८९६ मध्ये रहात होते त्यावर 'इंग्लिश हेरीटेज'ने त्यांच्या नावाची लावलेली पाटी**

इंग्लंडला स्वामीजी तीनदा आले. इथे सुमारे तीस - बत्तीस वेगवेगळ्या ठिकाणी ते राहिले. इथे त्यांनी वेदान्तावर प्रवचनं दिली. ज्या भारतीयांवर इंग्रज राज्य करत होते त्याच भारतीय संस्कृतीची इंग्रजांना नव्याने ओळख करून दिली. भारतालाही जगाकडे काहीतरी देण्यासारखे आहे आणि जगाने भारताकडून काहीतरी शिकण्यासारखे आहे ह्या गोष्टींची पाळंमुळं स्वामीजींनी जगभरात - खासकरून स्वतः ला 'सुसंस्कृत' म्हणवणाऱ्या पाश्चिमात्य जगात रुजवली. त्यांच्या ह्या कार्याला तोड नाही.

स्वामीजी राहिलेल्या तीस - बत्तीस ठिकाणांचे इथले पत्ते मी वेगवेगळी कागदपत्रं अभ्यासून आणि तपासून शोधून ठेवलेले आहेत. काही वास्तू आणि पत्ते अजूनही शिल्लक आहेत. काही पत्ते आता नाहीत, पण त्या जागा नक्की केलेल्या आहेत. हे करोनाचं संकट संपलं की इथे एकदा 'स्वामी विवेकानंद रोड ट्रीप' करायचा माझा विचार आहे. ब्रिटनमध्ये ज्या ज्या ठिकाणी स्वामीजी गेले त्या त्या ठिकाणी भेट द्यायची आहे. त्या जागा प्रत्यक्ष पहायच्या आहेत. स्वामीजींच्या कार्यक्षेत्रांसमोर - जिथे जिथे ते प्रत्यक्ष राहिले आणि वावरले त्या वास्तूंसमोर नतमस्तक व्हायची इच्छा आहे.

कधी जमतंय - कसं जमतंय बघू या. पण आज स्वामीजींच्या जयंतीनिमित्ताने त्यांना शत शत प्रणाम!

**- संकेत कुलकर्णी**
लंडन

•••

---

(पृष्ठ क्र. ९ वरून - **डिजिटल रुपया क्रिप्टो करन्सी नाही**)

केंद्र सरकारात सत्तारूढ असणारी व्यक्ती आणि पक्ष यांचा समर्थक किंवा विरोधक असण्याचा हा विषय जरासुद्धा नाही. जागतिक पातळीवर शंका-वाद-चिंता यांच्या भोवऱ्यात सापडलेल्या क्रिप्टो-करन्सीशी प्रस्तावित डिजिटल रुपयाची तुलना करणे हे ना डिजिटल रुपया या विषयाच्या आत्मसन्मानाला धरून होईल, ना कोणत्याही सर्वसामान्य भारतीय नागरिकांच्या सद्सद्विवेकबुद्धिला! कारण हा संकुचित राजकीय गदारोळाचा विषय नसून निखळ अर्थकारणाचा मामला आहे. (जुमला नाही !)

**- चन्द्रशेखर टिळक**
सी -४०२. राज पार्क,
मढवी बंगल्याजवळ,
राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व )
पिन - ४२१२०१
भ्रमणध्वनी - ९८२०२९२३७६


•••

---

आयुष्यात चुकीची व्यक्ती आपल्याला योग्य धडा शिकवते, तेव्हा जीवन जगण्याची कला कळते!

# आवर्जून वाचावं असं काही : रिचर्ड एल्मनचे 'फोर डब्लिनर्स'

*रिचर्ड एल्मननं त्याच्या करीयरच्या शेवटी लिहिलेलं पुस्तक "Four Dubliners: Wilde, Yeats, Joyce and Beckett' . १९८६ मधे हे पुस्तक प्रकाशित झालं. पुस्तक छोटेखानी आहे-१२६ पानांचं. त्यात एल्मननं चार आयरिश लेखकांच्या विषयी लिहिलेले चार दीर्घ निबंध आहेत. यांत वाईल्ड, यीटस, जॉयस आणि बेकेटचा समावेश आहे. या पुस्तकावर डॉ. आनंद कुलकर्णी यांनी प्रस्तुत लेखात भाष्य केलंय - संपादक*




तुमच्या पैकी अनेकांनी प्रसिद्ध व्यक्तींची चरित्रं वाचली असतील. यांत अर्थातच अनेक प्रकारची चरित्रं येतात. पण काही चरित्रांचा आपल्या मनावर खोलवर परिणाम होतो. ही चरित्रं दीर्घकाळ लक्षात राहतात, अनेक प्रसंगात मार्गदर्शन करतात, कितीतरी विचार, संकल्पना स्पष्ट करतात आणि भावनांचा गुंता अलगद सोडवतात. त्यातील काही प्रसंग जणू मनावर कोरले जातात. प्रसिद्ध व्यक्तींची जीवनचरित्रं वाचताना असं होतं याचं महत्त्वाचं कारण म्हणजे त्या व्यक्तींचं अफाट कर्तृत्व, अतुलनीय कामगिरी. पण मला वाटतं यासाठी अजून एक तितकंच महत्त्वाचं कारण आहे- चरित्रकाराने अशा व्यक्तींची चरित्रात केलेली प्रभावी मांडणी. चरित्र नायकाचं मोठेपण, त्याचे विचार, कृती आणि त्याचा जीवनपट यांची योग्य सांगड घातली गेली तर चरित्र उठावदार तर होईलच, पण प्रेरणादायी सुद्धा होईल. या दृष्टीने चरित्रलेखन ही मोठी कला आहे आणि ती ज्याला प्राप्त झाली आहे तो चरित्रनायकाला वाचकांसमोर ठेवण्यात यशस्वी होतो. अर्थात यांत मोठी जोखीम आहे. चरित्र लेखनात फक्त व्यक्तीगत जीवनाला उजाळा देऊन चालत नाही. त्याकाळातील सामाजिक जीवनाचा कानोसा घ्यावा लागतो आणि त्याची संगती लावावी लागते. कशाला महत्त्व द्यायचं हे ठरवावं लागतं. नाहीतर लेखन भरकटण्याची शक्यता असते. या सगळ्यांसोबत भाषेचा वापर अतिशय महत्त्वाचा असतो. एकदा चरित्रनायकाविषयी मांडायचा आशय ठरला, की भाषाशैली निश्चित करणं आवश्यक असतं. काय सांगायचंय हे निश्चित झालं की कसं सांगायचं हे निश्चित करावं लागतं. चरित्रकारासाठी हे दोन्ही घटक महत्त्वाचे असतात. त्यात आवश्यक ती सुसंगती आणि एकजिनसीपणा आला, की चरित्र वाचकांवर भुरळ घालणारं होतं. हे सोप नसतं. यासाठी चरित्रकार म्हणून तुमच्याकडे चरित्र-नायक ज्या काळात होऊन गेला त्या काळाचं सांगोपांग आकलन पाहिजे, बदलत जाणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक धारणांची जाणीव पाहिजे, वर्तमानाचं अचूक भान पाहिजे. चरित्र नायकाच्या जीवनाचा वस्तुनिष्ठ अभ्यास पाहिजे, त्याच्या विचारांचा योग्य अन्वय लावता यायला पाहिजे आणि त्याच्या कृतीतून दिलेला संदेश शब्दांत मांडता यायला पाहिजे. चरित्र नायकाच्या जीवनातील वास्तवाची मोडतोड न करता आणि नायकाला अनावश्यकपणे खूप मोठं किंवा छोटं न करता आहे तसं मांडणं किती अवघड असतं ना! त्यासाठी वास्तवावर जशी पकड हवी तशी नायकाच्या मनात डोकावता येईल अशी संवेदना हवी. हा तोल सांभाळणं म्हणजे तारेवरची कसरत! पण मी असा तोल सशक्तपणे सांभाळून चरित्र लिहिणारा लेखक वाचलाय. त्याचं नाव आहे- रिचर्ड एल्मन (Richard Ellmann.)

अमेरिकन लेखक, समीक्षक, चरित्रकार. आणि बाय द वे हे महाशय नुसते चरित्रकार नाहीत, तर साहित्यिक चरित्रकार आहेत. म्हणजे तो फक्त जीवनचरित्र लिहीत नाही, तर साहित्यिक कामगिरीविषयी लिहितो. एल्मन हा माझा सर्वात आवडता चरित्रकार आहे. जेम्स बॉझवेलनंतर कदाचित सर्वोत्तम चरित्रकार. बॉझवेलने 'द लाईफ ऑफ सॅम्युअल जॉन्सन' हे जगप्रसिद्ध चरित्र लिहिलं होतं. १७९१ मधे ते प्रकाशित झालं. आधुनिक साहित्यविश्वात चरित्रलेखनाचा साहित्यप्रकार जोमदारपणे प्रवाहित करणारं हे क्लासिक चरित्रं. खूप मागे वाचलं तेव्हा ते मला प्रचंड आवडलं होतं. याचं माझ्यापुरतं महत्त्वाचं कारण म्हणजे ते मला अतिप्रिय असलेल्या समीक्षक डॉ. जॉन्सनविषयी होतं. त्यानंतर मला साहित्यिकांची चरित्रं आवडली ती एल्मननं लिहिलेली. एल्मन अमेरिकन आणि त्यानं चरित्रं लिहिली ती आयरिश लेखकांची. त्यानं डब्लू. बी. यीटस, जेम्स जॉयस आणि ऑस्कर वाईल्ड यांची चरित्रं लिहिली. एकाहून एक सरस, वाचनीय, आनंददायी. ही चरित्रं म्हणजे लेखकांच्या आयुष्यातील फक्त नोंदी नाहीत, ती त्यांच्या साहित्यावर केलेलं अतिशय दर्जेदार भाष्यं सुद्धा आहेत. या लेखकांच्या समीक्षकांना वाचून आपल्याला जे कळत नाही ते एल्मनची चरित्रं वाचून कळतं. (माझ्यापुरता अपवाद सॅम्युअल बेकेटचा. James Knowlson चं Damned to Fame: The Life of Samuel Beckett हे माझ्यामते बेकेटचं सर्वोत्तम चरित्र आहे.) उदाहरणच द्यायचं तर जेम्स जॉयसच्या 'फिनेगन्स वेक' या कादंबरीचं देता येईल. १९३९ मधे प्रकाशित झालेली ही कादंबरी वाचायला आणि कळायला प्रचंड अवघड आहे. ती जॉयसने तशी अवघड केली आहे. पण एल्मननं ही कादंबरी वाचली आणि जॉयसच्या चरित्रात त्यावर खूप चांगलं भाष्य केलं आहे.

एल्मनचे इंग्रजी केवळ अप्रतिम! विलक्षण प्रवाही, धारदार, आशयघन. तो चिंतनशील आणि भावोत्कट लिहितो. त्याने लिहिलेलं चरित्र वाचताना आपण एखादी कसदार साहित्यकृती वाचतोय असा फील येत राहतो. म्हणजे चरित्र नायकाच्या जीवनाविषयी लिहिता लिहिता एल्मन नायकाच्या लेखनविश्वात आपल्याला हळूवारपणे कधी घेऊन जातो ते कळत नाही. हे म्हणजे सुरवंटाचं फुलपाखरू होण्यासारखं असतं. एखाद्याच्या आयुष्यातील घडामोडींविषयी लिहिताना अलवारपणे त्याच्या कलात्मक निर्मितीविषयी निरूपण करण्यासारखं सुखद.

मी ज्या पुस्तकाविषयी तुम्हाला सांगणार आहे ते एल्मननं त्याच्या करीयरच्या शेवटी लिहिलेलं पुस्तक आहे. 'Four Dubliners: Wilde, Yeats, Joyce and Beckett' हे या पुस्तकाचं शीर्षक. १९८६ मधे हे पुस्तक प्रकाशित झालं. पुस्तक छोटेखानी आहे-१२६ पानांचं. त्यात एल्मननं चार आयरिश लेखकांच्या विषयी लिहिलेले चार दीर्घ निबंध आहेत. यांत वाईल्ड, यीटस, जॉयस आणि बेकेटचा समावेश आहे. यांतील वाईल्ड आणि यीटस हे व्हिक्टोरियन कालखंडाच्या उत्तरार्धात बहरलेले लेखक. त्यामुळे त्यांच्यावर आणि खासकरून वाईल्डवर व्हिक्टोरियन मूल्यांचा प्रभाव होता. यीटस रोमँटिसिझम आणि आधुनिकतावाद यांना जोडणारा फार मोठा कवी. जॉयस आणि बेकेट हे सर्वार्थाने आधुनिक लेखक आणि आयर्लंडमधून फ्रान्सला स्थलांतरीत झालेले. एल्मन या लेखकांच्या जीवनाविषयी थोडक्यात लिहितो, शिवाय त्यांच्यातील परस्पर संबंध आणि प्रभावांचीही चर्चा करतो. या लेखकांच्या समकालीन इतर प्रसिद्ध व्यक्ती आणि संदर्भांविषयीही तो लिहितो. उदाहरणार्थ एल्मन Oscar Wilde at Oxford या पहिल्याच निबंधात Wilde ला शिकविणाऱ्या तरुण वॉल्टर पेटर आणि थोराड जॉन रस्कीन या दोन विद्वान समीक्षकांमधील फरक अतिशय मनोज्ञपणे उलगडून दाखवतो. आणि असा फरक दाखवणं अनाठायी किंवा विसंगत नसतं. कारण रस्कीनच्या विचारांचा वाईल्डवर कसा आणि का प्रभाव पडला याची कारणमीमांसा

माणूस म्हणतो, पैसा आला की मी काहीतरी करेन, पैसा म्हणतो, 'तू काही तरी कर मगच मी येईन.'

करताना ओघात आलेला हा फरक आहे. तसेच, पेटरच्या मतांना वाईल्डने का नाकारलं याचाही यात ऊहापोह आहे. 'सौंदर्य' या साहित्यिक मूल्याविषयी पेटर आणि रस्कीन यांच्यात असलेल्या भेदांविषयीची ही चर्चा आहे. मोजक्या आणि अचूक शब्दांत एल्मन ती मांडतो. डोक्यात लख्ख प्रकाश पडावा इतकं हे लेखन तीक्ष्ण आणि टोकदार आहे. इंग्रजी तर केवळ मोहरून आलेली! ही काही वाक्यं बघा-

Though both Ruskin and Pater favoured beauty, for Ruskin it had to be allied with good...Ruskin spoke of faith; Pater spoke of mysticism...Ruskin appealed to conscience, Pater to imagination. Ruskin invoked disciplined restraint, Pater allowed for a pleasant drift. What Ruskin loathed as vice, Pater caressed as wantonness.

या निबंधाच्या सुरुवातीलाच एल्मन वाईल्डविषयी एक अतिशय छोटं विधान करतो आणि उर्वरित पूर्ण निबंध म्हणजे जणू या विधानाचं स्पष्टीकरणचं असतं. त्याच्या मते वाईल्ड म्हणजे- Wit, grace, unexpectedness: these are his essence...

खरं तर असं चटकदार, अर्थपूर्ण आणि सुभाषितासारखं लिहिण्याची शैली वाईल्डची होती. पण एल्मन वाईल्डविषयी लिहिताना हीच शैली वापरतो. वाईल्डकडे असं चटकदार लिहायचा गुण त्याच्या आईकडून आला होता. हे सांगताना एल्मन वाईल्डच्या आईविषयीचे काही खुमासदार किस्से सांगतो. वाईल्डच्या आईचं नाव गशपर होतं पण ती तिचं नाव Speranza असं लिहायची. Speranza हे इटालियन नाव आहे आणि त्याचा अर्थ आशा असा होतो. असा नावात बदल का केला असं विचारल्यावर ती सांगायची की तिच्या माहेरचा आणि दांते अलिघेरीच्या कुटुंबाचा संबंध होता. दांते हा १४ व्या शतकातील प्रसिद्ध इटालियन कवी होता आणि त्याच्या घराण्याशी संबंध असल्याचा तिला अभिमान असायचा. अर्थात यात मिरविण्याची हौस अधिक आणि तथ्य कमी असा प्रकार होता. तुमच्यापैकी अनेकांनी वाईल्डचं The Importance of Being Earnest वाचलं असेल. त्याची मुळं वाईल्डची आई आणि तिच्यासारख्या अनेक व्हिक्टोरीयन स्त्रीयांमधे सापडतात. या काळात आयरिश लोकं ब्रिटिशांविरुद्ध संघर्ष करत होते. तेव्हा त्यांचं मनोबल वाढावं यांसाठी जेना कविता लिहीत असे. जेनाचं हे लिहिणं तिच्या कुटुंबाच्या युनीयनीस्ट (ब्रिटिशधार्जिण्या) धोरणाविरुद्ध होतं. पण तिने त्याची पर्वा केली नाही. काही काळानंतर तिचा आयरिश स्वातंत्र्य लढ्यातील रस कमी झाला आणि तिने आयरिश लोकांच्या समर्थनार्थ कविता लिहिणं थांबवलं. याच काळात काही आयरिश लोकांना तिच्या जुन्या कविता पुन्हा प्रकाशित करायच्या होत्या. तिने प्रूफ रिडींग करावं यासाठी या लोकांनी तिला विनंती केली. तिनं ते अर्थातच नाकारलं. त्यावर तिचं उत्तर असं होतं- I cannot trade the ashes of that once glowing past. वाईल्डला असा सत्तेला थेट आव्हान देण्याचा बंडखोरपणा आणि सुभाषितवजा लिहायची शैली आईकडून मिळाली होती.

डब्लू. बी. यीटस या दुसऱ्या आयरिश कवीवर लिहिताना एल्मन त्याच्या आयुष्यातील शेवटचा काळ निवडतो. या काळात यीटसला नवीन कविता सुचत नव्हत्या. याचा संबंध यीटसने त्याच्या वार्धक्याशी आणि त्यातून कमी होत गेलेल्या त्याच्या लैंगिक क्षमतेशी जोडला होता. आपली लैंगिक क्षमता वाढली तर आपली हरवलेली निर्मितीक्षमता परत येईल अशी यीटसची अटकळ होती. यांसाठी यीटसने इंग्लडमधील तेव्हाच्या प्रसिद्ध लैंगिकतज्ञ असलेल्या नॉर्मन हेयर (Norman Haire) यांच्याकडून १९३४ मधे शस्त्रक्रिया करून घेतली. यीटस यावेळी ६८ वर्षांचा होता. अशी शस्त्रक्रिया त्याकाळात युरोपातील अनेक लोकांनी करून घेतली होती. जणू हा तेव्हाचा ट्रेंडच होता. त्यात जगप्रसिद्ध

मनोविज्ञान चिकित्सक सिग्मंड फ्राईड याचाही समावेश होता. अर्थात फ्रॉईडने लैंगिक क्षमता वाढविण्यासाठी ही शस्त्रक्रिया केली नव्हती, तर त्याच्या तोंडाला झालेल्या कर्करोगाला आराम पडावा म्हणून केली होती! त्याचा त्याला काही उपयोग झाला नाही हा भाग निराळा. या शस्त्रक्रियेमुळे यीटसच्या शारीरिक क्षमतेत फार फरक पडला नाही पण त्याची हरवलेली कविता (सर्जनशीलता) त्याला परत मिळाली. एल्मन यीटसच्या या व्यक्तीगत आयुष्यात घडलेल्या घटनेचा संबंध त्याच्या कवितांशी जोडून दाखवतो. यीटसने त्याच्या उर्वरित पाच वर्षांच्या आयुष्यात अनेक कविता, चार पद्य नाटके लिहिली आणि इतरही खूप प्रकारचं लेखन केलं. १९२६ मधे यीटसने A Vision नावाचं पुस्तक प्रकाशित केलं होतं. यीटसच्या सगळ्या लेखनातलं सगळ्यात विचित्र म्हणावं असं हे पुस्तक. त्याच्या पत्नीसोबत त्यानं ते लिहिलं. यीटस पती-पत्नीचा गूढ, रहस्यमयी आणि चमत्कारवादी गोष्टींवर विश्वास होता. भूत, वर्तमान आणि भविष्य असे सर्व काळ एकाच वेळी अस्तित्वात असतात आणि जगणं असं एकाचवेळी अनेक काळातील असतं अशी यीटसची धारणा होती. अनेक धर्म, तत्त्वज्ञान आणि गूढ साहित्याचा अभ्यास करून यीटस पती-पत्नींनी हे पुस्तक लिहिलं. खरं तर जेनानं आपल्या नवऱ्याचं लक्ष आपल्यात गुंतून राहावं यासाठी वापरलेली ती युक्ती होती. पण यीटसने ती गांभीर्याने घेऊन जेनासोबत हे पुस्तक लिहिलं. कालांतराने यीटसला त्यात बदल करणं आवश्यक वाटलं. १९३८ मधे या पुस्तकाची सुधारित आवृत्ती सिद्ध झाली. यीटस पती-पत्नीच्या वैवाहिक आयुष्यात बीजं असलेल्या या पुस्तकाला यीटसने प्रेम, सौंदर्य आणि शहाणपण यांचं अद्भूत मिश्रण असलेलं पुस्तक असं स्वरूप दिलं. त्याच्या प्रतिभेचा मिडास टच होता या पुस्तकाला. त्यामुळेच त्याच्या 'व्हिजनचं' सुंदर 'रिव्हीजन' होऊ शकलं. एल्मन याचं वर्णन किती लोभस शब्दांत करतो बघा-

By introducing the unpredicatable into a system pedicated on predictability, Yeats kept the relation of physical and metaphysical forever wavering. So these two great issues- of spirit and substance, of freedom and compulsion- were left as blurred in the second Vision as they had been in the first.

जेम्स जॉयस हा प्रतिभावंत आयरिश कादंबरीकार. आयर्लंड सोडून फ्रान्समधे स्थायिक झालेला. एल्मन त्याची कला आणि सौंदर्याची संकल्पना या निबंधात उलगडून दाखवतो. अर्थात हे करताना एल्मन जॉयसच्या आयुष्यातील आणि त्याच्या पुस्तकातील संदर्भ देत राहतो. जॉयसला त्याची पुस्तकं जगभरात सर्वांनी वाचावीत आणि त्यातून तो आणि त्याचं साहित्य अजरामर व्हावं अशी जबरदस्त इच्छा होती. अर्थात आधुनिक इंग्रजी कादंबरीचा इतिहास आणि अभ्यास त्याच्या कादंबऱ्यांशिवाय पूर्ण होतं नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यानं लिहिलेली 'फिनेगन्स वेक' ही कादंबरी खूप दुर्बोध आहे. ती अशी का आहे असं विचारल्यावर जॉयस म्हणाला होता- To keep the critics busy for three hundred years. अशी आठवण सांगून एल्मन जॉयसची प्रयोगशीलता, दुर्बोधता आणि कलेवरील निष्ठा किती वेगळ्या प्रकारची आणि भक्कम होती हे सुचवतो. जॉयस जरी डब्लीन सोडून पॅरीसला स्थायिक झाला होता तरी आयरिश संस्कृती त्याच्या मनातून निघून गेली नव्हती. आयरिश ठिकाणं, व्यक्ती आणि जीवनपद्धतीच्या रूपात आयरिश अस्तित्व त्याच्या सगळ्या कादंबऱ्यांत उमटलेलं दिसतं. अर्थात जॉयसला त्याच्या काळात असलेलं आयर्लंड नको होतं, त्यानं कल्पिलेलं आयर्लंड त्याला हवं होतं. जॉयसचा कलाप्रवास इतका अपारंपरिक आणि मूलगामी होता की, त्याच्या कादंबरींनी कादंबरी लेखनाच्या सर्व प्रस्थापित परंपरा आणि तत्त्वं झुगारून दिली. कादंबरी लेखनात त्याने भाषेवर उत्तरोत्तर प्रयोग केले. जॉयसचं कलामूल्यं आणि वेगळेपणा सांगताना एल्मन लिहितो-

Joyce thought of his books as way stations on psychic journey. His last book, 'Finnegans Wake', was an event more extravagant than excursion into forbidden territory, since it invaded the region of language itself, a region which other novelists had left inviolate.

जॉयसने साहित्याचं स्वरूप मूलगामी केलं, कथनात्मकतेची पुनर्रचना केली, आणि भाषेला आपल्या अबोध मनाची निर्मिती आणि प्रेरणा मानली. या सगळ्याचं अतिशय प्रभावी विवेचन एल्मन करतो.

या पुस्तकाचा शेवटचा भाग म्हणजे सॅम्युअल बेकेटवर लिहिलेला निबंध. बेकेट जॉयससारखाच आयरिश आणि पॅरीसला स्थलांतर केलेला लेखक. पण बेकेटचा ना आयरिश राष्ट्रवादावर विश्वास होता ना इतर कोणत्या राष्ट्रवादावर. त्यामुळे जॉयससारखा बेकेट आयरिश संस्कृतीविषयी आस्था असलेला लेखक नव्हता. बेकेटचं व्यक्ती आणि लेखक म्हणून स्वतंत्र, स्वायत्त असणं एल्मन पहिल्याचं वाक्यात सांगतो-

Samuel Beckett is sui generis, a writer with his own stamp, assured and stylized.

असं संस्कृती आणि राष्ट्रनिरपेक्ष असूनही बेकेटच्या लेखनात आयरिश पाऊलखुणा दिसतात हे एल्मन उदाहरणांसह पटवून देतो. आयरिश नावांविषयी बेकेटला विशेष ममत्व आहे. त्यातही 'म' अक्षराने सुरू होणारी आयरिश नावं- Murphy, Molloy, Moran. बेकेटने त्याची नाटकं इंग्रजीत अनुवादीत केली. या अनुवादांना आयरिश ढब आहे असा एल्मनचा दावा आहे. उमेदवारीच्या काळात बेकेटच्या पॅरिस-डब्लीन-पॅरिस अशा वाऱ्या झाल्या. मधेच डब्लीनला येऊन बेकेटने ट्रिनीटी कॉलेजात शिक्षकाची नोकरी केली. पण जे आपल्याला समजत नाही ते दुसऱ्यांना कसं शिकवणार असा प्रश्न पडल्यामुळे बेकेटने ही नोकरी सोडली आणि पुन्हा पॅरिस गाठलं. फ्रान्समधे तो मनसोक्त भटकला, काहीही काम न करता वेळ घालवावा, तिथली भाषा शिकला. शेवटी करण्यासारखं काहीही उरलं नाही आणि तरीही आपण अजून जगतोचं आहोत हे कळल्यावर बेकेटने लिहायला सुरुवात केली. बेकेटने लेखन करताना कशाचाही मुलाहिजा बाळगला नाही, कोणत्याही परंपरेचं आणि नियमांचं जोखड स्वीकारलं नाही. असं अनवट आणि अपरिचित लेखन करणारा बेकेट कसा होता याचं अतिशय हृद्य आणि प्रभावी वर्णन एल्मन करतो-

Compositions of all kinds- often hard to label in traditional terms of genre- sprang from his sense that the old relations of authors to their subjects, to their characters, to their language, to their readers,and even to their own selves were discredited...he was impatient to his own modes of pursuits...

काय अचूक आणि विलक्षण सुंदर इंग्रजीत केलेलं हे वर्णन आहे! बेकेटच्या जगावेगळ्या, असामान्य शैली आणि आशयाचं, जीवनाकडे बघण्याच्या शून्यवादी आणि तरीही जीवनवादी दृष्टीकोणाचं यापेक्षा अधिक समर्पक वर्णन काय असू शकेल?

बेकेटची मानवी जीवनाकडे बघण्याची स्वत:ची अशी दृष्टी होती आणि ती त्याच्या लेखनात उतरते. त्याच्यावर प्रभाव कोणत्याचं तत्त्वज्ञानाचा नव्हता. त्याचं चिंतन हेचं त्याचं तत्त्वज्ञान होतं. तुलना करायची तर अगदी मध्ययुगीन काळापासून प्रभावी ठरलेल्या रेने देकार्त या फ्रेंच तत्त्वज्ञाच्या दृष्टीकोणाशी करता येईल. देकार्त 'मी विचार करतो म्हणून मी आहे' असं म्हणाला होता. बेकेट त्याच्या कितीतरी पुढे आहे. बेकेटच्या मते 'मला दु:ख होतं म्हणून मी असू शकेन'. मानवी अस्तित्व आणि त्याचा अर्थ समजून घ्यायचा हा अगदी खास बेकेटीयन प्रकार आहे. बेकेटच्या लेखनात प्राधान्याने अभावग्रस्तता आहे. म्हातारे, अस्थिर, दुबळे लोकं त्याच्या लेखनात असतात. याचा अर्थ दु:ख, वेदना, अभावग्रस्तता बेकेटला आवडतात असं नाही.

(पृष्ठ क्र.२८ वर)

# हयवदन

*विज्ञान कथा हा विज्ञान प्रसाराचा एक प्रभावी मार्ग आहे. कधी कधी या कथेला कल्पनेची जोड दिली जाते. असाच एक प्रयत्न विज्ञान लेखक डॉ. रंजन गर्गे यांनी केलेला आहे. मज्जासंस्थेवरील नियंत्रण गमावलेल्या व्यक्तीवर मस्तकरोपण करून इलाज करता येतो, या कल्पनेवर ही कथा आधारलेली आहे. कथा मनोरंजक करण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. - संपादक*

ते घड्याळ, त्यावर बांधलेले दिवस, त्यावर धावणारा माणूस, माणसासाठी घड्याळ की घड्याळासाठी माणूस? तेच समजत नव्हतं. दोघेही पळायचे! माणसाने नैसर्गिक आपत्तीपासून स्वतःचं संरक्षण केलं आणि नैसर्गिक मृत्यू थांबले, रोगचिकित्सा आणि औषधोपचार पद्धती विकसित झाल्या आणि रोगराईमुळे आणि जंतुसंसर्गामुळे माणसं मरायची थांबली. निसर्गाला सुद्धा शक्य होईल तेवढं ओरबाडून झालं आहे आता. आयुष्मान वाढलं. हवंतसं, हवंतितकं जगा. कंटाळा आला तर हवं तसं आनंदाने मृत्युला कवटाळा ! खरं असो वा आभासी, पण पुनर्जन्मावर विश्वास असल्याने 'मी आलोच जाऊन!' असं म्हणत विविध जन्मांचा आस्वाद घेण्याची तल्लफ चढली होती मानवाला. युद्ध, असूया, मत्सर, स्पर्धा हवीच कशाला? नैसर्गिक ऋतुचक्राशी माझ्या अस्तित्वाचा संबंधच मुळी आहे कुठे ? नैसर्गिक साधन संपत्ती हवीच कशाला ? शिल्लक आहे तेवढी पुरेशी आहे!

हे सगळं मात्र निसर्गाला कसं परवडणार? ना प्रगतीला अर्थ उरला ना उन्नतिला. मग त्या निसर्गाने मानवाचा जन्मच अडवला. स्त्री बिजं आणि शुक्रजंतु तयार होईनात. गर्भपेशी मृत झाल्या. टेस्टट्यूब बेबी आली, क्लोन आले. गर्भाशय गर्भधारण करेना म्हणून कृत्रिम गर्भधारणा करणारे कारखाने अस्तित्वात आले. मानवाने जणू जन्मूच नये ! सगळे उपाय संपले. वसुंधरेची लोकसंख्या निम्म्यावर आली. सुखसोईंचा डोंगर समोर उभा असताना त्याचा उपभोग घ्यायलाच कुणी नाही ! कारण सगळेच वृद्ध पंथाला लागलेले.

मानवाने निसर्गावर मात करण्यासाठी सगळं डोकं वापरलं होतं, 'मुहमे राम, बगलमे छुरी' अशा पद्धतीने निसर्गाशी वरवर गोड बोलून त्याने स्वार्थासाठी निसर्ग संपवला होता. मानवजात संपत आली असली तरी तो मुळीच हवालदिल झालेला नव्हता. त्याच्या संवेदनशीलतेचं काय! इतका भावनाशून्य झालाच कसा?

खरं म्हटलं तर माणसाला अपूर्ण असल्याची खंत नेहमी सतावत असते. अपूर्णत्व हा त्याला शाप आहे असं वाटत असतं. या अपूर्णत्वाच्या भावनेतून सुटका करून घेण्यासाठी तो सतत धडपडत असतो. अशीच एक अपूर्णत्वाची भावना म्हणजे स्त्री-पुरुष असमानतेची.

अनेक सामाजिक आव्हानं समोर होती. अवयव बदलता येत होते, जनुकं बदलता येत होती, लिंग बदलता येत होतं. मानवी उत्क्रांतीच्या इतिहासाला ३१ व्या शतकाच्या सुरुवातीच्या सुमारास आणखीन एक वेगळंच वळण मिळालं होतं. 'मानवाने जणू जन्मूच नये' अशा पद्धतीने जेव्हा जगभर सामाजिक संस्थांनी आपली भूमिका घ्यायला सुरुवात केली तेव्हा अल्पसंख्येत गेलेल्या पर्यावरणवादी मंडळींनी आंदोलनं उभी केली. समाजाने नेमकी कुठली भूमिका घ्यायची यावरती दुर्दैवाने तंत्रज्ञांचा अंकुश होता. स्त्री आणि पुरुष हा भेदच समाजाला मान्य नव्हता. पारंपरिक पद्धतीने मूल जन्माला यावं असं म्हणणाऱ्या पर्यावरणवादी महिलांना सुद्धा मूल नऊ महिने पोटात बाळगणं मात्र मान्य नव्हतं. प्रश्न समानतेचा होता. म्हणजे मानवाने नैसर्गिकरित्या मूल जन्माला घालावं, पण पुरुषाला सुद्धा त्यातल्या वेदना कळाव्यात.

तंत्रज्ञांशी चर्चा केल्यानंतर अशा पारंपरिक समाजासाठी एक नवीन उपाय सुचवण्यात आला होता.

---

आपल्या माणसांसोबत वेळ कळत नाही, पण वेळेसोबत आपली माणस नक्कीच कळतात!

स्त्री-पुरुष असा लिंगभेद राहणार नाही आणि स्त्री-पुरुष समागमाची देखील गरज भासणार नाही अशा 'उभयलिंगी समाजाची' निर्मिती करण्याचं वसुंधरावासियांनी जाहीर केलं. यासाठी 'लिंग बदला'च्या शस्त्रक्रियांच्या ऐवजी आता 'लिंग रोपणा'च्या शस्त्रक्रिया विकसित करण्यात आल्या होत्या. स्त्रीच्या शरीरावर पुरुषाचं लिंगरोपण आणि पुरुषाच्या शरीरावर स्त्रीचं लिंगरोपण करून उभयपंथी अल्पसंख्यांक समाजाची निर्मिती सुरू झाली. गांडूळ किंवा गॉडझिला या प्राण्यांमध्ये मादी आणि नर अशी दोन्ही लिंग असल्यामुळे एकटा प्राणी प्रजोत्पादन करू शकतो. अशा प्राण्यांना शास्त्रीय भाषेत हार्मोफ्रोडाईट असं म्हणतात. माणूस सुद्धा हार्मोफ्रोडाईटिझमकडे वाटचाल करू लागला होता.

उभयपंथी समाजाचं वैशिष्ट्य असं होतं की, होणाऱ्या मुलांची आई आणि बाप ही ती जन्माला घालणारी एकच उभयलिंगी व्यक्ती असणार होती. परंतु जन्माला येणारी मुलं मात्र मुलगा किंवा मुलगी म्हणून जन्माला येणार होती. या नव्याने जन्माला येणाऱ्या मुलाने किंवा मुलीने लिंगरोपण करून घ्यायचं की नाही याची मुभा किंवा स्वातंत्र्य त्यांना दिलेलं होतं.

समाजात आता स्त्री-पुरुष समानता आली होती. उभयपंथी अल्पसंख्यांक समाज आनंदी होता. पूर्णत्वाच्या परमोच्च बिन्दूवर मानव विराजमान झाला होता. प्रत्येक प्रश्नाला तो तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उत्तर मिळवत होता. कृत्रिम रक्त, पाणी, अन्न आणि प्राणवायूचे कारखाने जोमात कार्यरत होते.

सध्या मात्र मानवाला पूर्णत्वाचाच पार कंटाळा येऊ लागला होता. अपूर्णत्वातलं थ्रिल त्याला पुन्हा खुणावत होतं. गम्मत अशी की, पूर्णत्वातून सुटका करून घेण्यासाठी त्याची आता सतत धडपड सुरू झाली होती. अपूर्णत्व म्हणजे काय? पूर्णत्वाकडून अपूर्णत्वाकडे जाणारा हा उलटा प्रवास कसा असेल हे त्याला नेमकं जरी उलगडलं नसलं तरी त्याकडे तो चांगलाच आकर्षित झाला आहे. निसर्गाशी त्याने नेमका पंगा मुळीच घेतलेला नव्हता पण त्याच्यावरचं परावलंबित्व मात्र संपवलं होतं. मोठ्या चलाखीने पर्याय सुद्धा जरूर शोधले होते.

आपल्याकडे जे नाही ते मिळवण्याची मानवाची ओढ मात्र निसर्गाला धरून होती. एवढी एकच नैसर्गिक गोष्ट शिल्लक राहिली होती मानवाच्या संवेदनेत.

***

अविनाश आणि वैशाली सरंजामे हे औद्योगिक जगतात फार मोठं नाव होतं. आज त्यांचे चिरंजीव ह्रित्विक त्यांच्याच एका स्वतंत्र उद्योगाची जबाबदारी स्वीकारणार होते. त्या निमित्ताने एका भव्य लॉनवरती हजारेक प्रथितयश उद्योजक सहकुटुंब जमले होते. पार्टी ऐन रंगात आली होती. ह्रित्विक आज खूप रुबाबदार दिसत होता. पार्टीत बियर, शाम्पेन आणि व्हिस्की जणू वाहात होती. प्रत्येकजण ह्रित्विकचं वैयक्तिक अभिनंदन करत होता. ह्रित्विककडे काहीजण भविष्यातला उभरता प्रतिस्पर्धी म्हणून बघत होते; तर कुणी त्याच्याकडे आपला भावी जावई म्हणून! या कार्यक्रमाला स्वतः पंतप्रधान हजर राहणार होते. कारण हा नवा प्रकल्प पूर्णतः स्वदेशी तंत्रज्ञानातून विकसित झालेला होता. पार्टी जशी मध्यावर आली तसा पंतप्रधान येत असल्याचा संकेत मिळाला. स्वतःला सावरून सरंजामे कुटुंब कमानी दरवाज्याशी जाऊन स्वागतासाठी उभे होते. शाम्पेनची बाटली फोडून, बाटली घुसळत फेस हवेत उडवून आणि संगीताच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांचं भव्य स्वागत करण्यात आलं. डाव्या हातात ग्लास धरून उजव्या हाताने त्यात शाम्पेन ओतण्यासाठी ह्रित्विकने बाटली हातात घेतली खरी पण ........ , कितीही प्रयत्न करून शाम्पेनची धार नेमकी ग्लास मध्ये पडत नव्हती. एकदा प्रयत्न करून झाला ..... , दुसऱ्यांदा झाला ....... पण पुन्हा तेच. शेवटी बेमालूमपणे स्मितहास्य करत अविनाशनेच पंतप्रधानांचा ग्लास भरला आणि त्यांना सन्मानाने ऑफर केला. मोठ्यांदा चिअर्स म्हणून झालं आणि आता जेवणं सुरू करायला हरकत नाही असा संकेत देऊन मंडळी जेवणाकडे वळली. ह्रित्विकला

ओशाळल्या सारखं झालं होतं. स्वतःला सावरून त्याने पंतप्रधानांची पुढची सगळी व्यवस्था चोख सांभाळली. निघतांना पंतप्रधान म्हणाले सुद्धा 'यंग मॅन, यू आर द फ्यूचर ऑफ इंडिया, ऑल द बेस्ट.'

दुसऱ्या दिवशी सकाळी सरंजामे कुटुंबीय आणि आप्त स्वकीय सगळेच घराच्या समोर असलेल्या लॉन वरती फराळ करत होते. कालच्या कार्यक्रमाचं तोंड भरभरून कौतुक चाललं होतं. फराळ करत असताना पाण्याच्या तांब्यातलं पाणी पेल्यात ओतत असताना सुद्धा त्याला नेमकी तशीच कालसारखीच अडचण जाणवली. गेले दोन दिवस असा त्रास सातत्याने होतोय हे त्याच्या आता लक्षात आलं होतं.

डॉक्टर, ह्रित्विकला हा नेमका कसला आजार आहे? – अविनाश

– अविनाश, जरा धीराने घ्या. मी आता तुम्हाला जे सांगेन ते नीट लक्षपूर्वक ऐका. या आजारात मेरूदंडाच्या स्नायूंची झीज होते आणि ते हळूहळू नष्ट होतात. हा एक जनुकीय आजार आहे. मोटर न्यूरॉन पेशींचा हा आजार आहे. – डॉक्टर

– डॉक्टर, या आजारावरती उपाय आहेत ना?

अहो, असायलाच हवेत. जनुकोपचार पद्धती आता इतकी प्रगत झाली आहे की ह्रित्विक यातून नक्की बरा होईल असा माझा आत्मविश्वासच सांगतो आहे. काही काळजी करू नका.

डॉक्टर, आपण पृथ्वीच्या कुठल्याही कान्याकोपऱ्यात, जेथे उपचार उपलब्ध असेल तेथे जाऊन उपचार घेऊ ......... – अविनाश

– हो.. हो ... अविनाश साहेब, अहो मीही या बाबतीत तुमच्याइतकाच सकारात्मक आहे. काळजी करू नका. पण आपल्याला वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी प्रथम या रोगाचं नेमकं निदान करणं अत्यावश्यक आहे. मी बघतो काय करायचं ते. – डॉक्टर

सरंजामे कुटुंब मात्र खूपच तणावाखाली होतं. ह्रित्विकचे रोजचे व्यवहार नियमितपणे चालू होते. अतिप्रगत अशा या तंत्रज्ञानाच्या युगात काहीतरी मार्ग नक्कीच निघेल अशा आशेवर सरंजामे कुटुंबाचे दैनंदिन व्यावसायिक व्यवहार सुद्धा चालू झाले.

ह्रित्विकच्या चाचण्या पार पडल्या. डॉक्टरांनी सरंजामे कुटुंबाला आज हॉस्पिटलमध्ये बोलावून घेतलं होतं. या रोगासंबंधी सुशिक्षित कुटुंबांना अंधारात ठेवून किंवा खोटा दिलासा देऊन भागणार नव्हतं.

ह्रित्विकला झालेल्या रोगाचं नाव आहे 'वेर्डनिग–हॉफमन–डिसीज'. यात शरीरातल्या स्नायुंवरचा ताबा हळूहळू नाहीसा होत जातो. यात साधारण १२ ते १५ जनुकांमध्ये उत्परिवर्तनं होतात. यासाठी 'स्टेमसेल जनुकीय थेरपी'देण्याचा प्रयत्न केला जातो. मी असं म्हणतो आहे कारण ती सुद्धा रामबाण उपाय म्हणून अद्याप सिद्ध झालेली नाहीये. सध्यातरी यासाठी फक्त लक्षणांवर उपचारपद्धती केली जाते. मूळापासून हा आजार नष्ट करणं अद्याप विज्ञानाला शक्य झालं नाहीये. बसणं, उभं राहणं, चालणं यासाठी लागणाऱ्या स्नायुंची प्रथम झीज सुरू होते. त्यानंतर गिळणं, चावणं या क्रिया मंदावतात. आजाराची तीव्रता वाढली म्हणजे श्वसनक्रियेला अडथळा निर्माण व्हायला सुरुवात होते. या सगळ्या क्रिया निदान मंद गतीने चालाव्यात यासाठी फिजिओथेरपी बऱ्यापैकी उपयोगी पडू शकते. असं असलं तरी या आजाराचा धीराने आणि सकारात्मकतेने सामना केल्यास रोगी उत्तम प्रतिसाद देऊ शकतो. या आजाराची एक जमेची बाजू अशी आहे की, ह्रित्विकचा मेंदू कार्यक्षम राहील. तो विचार करू शकेल, निर्णय घेऊ शकेल, तो तांत्रिक सहाय्याने संवाद साधू शकेल...... वेळोवेळी मी मार्गदर्शन करीनच. पहिल्याच भेटीत एवढं पुरे. – डॉक्टर

आवंढा गिळून खोल आवाजात अविनाश म्हणाला, ''आपण आम्हाला याची पूर्व कल्पना दिली त्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत. 'आलिया भोगासी असावे सादर' म्हणतात ना तसं झालंय आमचं. जे जे

उपाय म्हणून सध्या जगात उपलब्ध आहेत ते ते आम्हाला वेळेवर कळवत जा''.

''प्रश्नच नाही, 'हे माझ्या हित्विकलाच का झालं' असा नाकारत्मक विचार मनात कधीच येऊ देऊ नका. अविनाश साहेब, आता ही माझी जबाबदारी म्हणून मी स्वीकारतो. हित्विक बेटा, काळजी घे. सकारात्मक रहा, केव्हाही वाटलं तरी मला तू फोन करू शकतोस.'' – डॉक्टर

***

३१ व्या शतकाच्या मध्यावर काळ येऊन ठेपला होता. मानवाची उत्क्रांती ही अव्याहत चालणारी प्रक्रिया असते. निसर्गाला कमीतकमी इजा पोहोचवून मानवाने मोठ्या हुशारीने नैसर्गिकता आणि कृत्रिमतेचा सुवर्णमध्य साधत प्रगतीची वाटचाल सुरू ठेवली होती.

नॅनो हे एक उभयपंथी हायटेक डॉक्टर कुटुंब. त्याचा पॉझिट्रॉन हा मुलगा आणि न्युट्रॉन ही मुलगी. अशा दोन्ही मुलांचा डॉ. नॅनो हा बाप आणि आई सुद्धा होता. 'पॉझि' आणि 'न्यूट्रि' असं तो त्यांना लाडाने हाक मारायचा.

नॅनो, अरे किचनमधून जरा बाहेर ये बरं, ही कसली जाहिरात आहे ? सगळ्याच माध्यमांवर सतत झळकते आहे. – पॉझि

आलो, आलो. काय ? 'हयवदन प्रायव्हेट लिमिटेड'. नाव तर अगदीच विचित्र दिसतंय. हे नवीनच दिसतंय काहीतरी. कोणाची आहे ही प्रायव्हेट लिमिटेड कंपनी? बघ ग न्यूट्रि काय म्हणताहेत ते – नॅनो

पुरुषांसाठी स्पेशल, महिलांसाठी स्पेशल असं काहीतरी ते म्हणताहेत. आपल्यासारख्या उभयपंथीसाठी काही नाही का रे यात ? – न्यूट्रि

नॅनो, अरे ही चित्रं पहिलीस का! शरीर मानवाचं आहे आणि मस्तक प्राण्याचं आहे. बघ, बघ ... अरे यातले पुरुषांसाठीचे करंट ट्रेण्ड्स बघितलेस का ? नर–वानर, नर–वराह, नर–सिंह आणि हा बघ काय छान दिसतो आहे रे नर–अश्व. या नर–अश्वाला म्हणे 'हयवदन' म्हणतात ! फॅन्टास्टिक कॉन्सेप्ट दिसतोय. – पॉझि.

या असल्या अफलातून कल्पना फक्त भारतीयांच्याच डोक्यातून निघू शकतात बुवा ! बघरे पॉझि, हे 'हयवदन' म्हणजे काय ? – नॅनो

बघतो हं, यस, सापडलं. भारतीय संस्कृत साहित्यात 'कथासरित्सागर' या ग्रंथातल्या एका कथेत या व्यक्तिरेखेचा आविष्कार झालेला आहे. घोड्याचं डोकं पण शरीर मात्र माणसाचं, असा हा विचित्र प्राणी आहे. वैज्ञानिक भाषेत त्याला 'किमेरा' असं म्हणतात. – पॉझि

म्हटलं ना ! ही शक्कल भारतीयांशिवाय दुसऱ्या कुणाची असूच शकत नाही. – नॅनो

ओह ! ग्रेट, या सुंदरी बघितल्या का ? त्यांची शरीरं प्राण्याची आहेत, पण मस्तकं मात्र स्त्री मानवाची! किती सुंदर दिसताहेत या!! बघ, अरे यात महिलांचे करंट ट्रेण्ड्स दाखवले आहेत. ही बघ मत्स्यगंधा किती सुंदर दिसतेय, सर्पगंधाच्या नाजूक लयबद्ध हालचाली खूपच मोहक आहेत रे! या मार्जारगंधेची चपळाई बघितलीस का? – न्यूट्रि

'किमेरा स्पेशल' म्हणून हे कोणाचं चित्र पुनःपुन्हा दाखवताहेत बघ रे जरा नॅनो ! काहीतरी इंटरेस्टिंग दिसतंय. अरे, एवढं जड हत्तीचं मस्तक मानवाच्या शरीरावर बेमालूम बसवलंय बघ कसं! गळ्यात अलंकार घालून किती लयबद्ध नाचतो आहे बघ ना! त्याचे भावनाप्रधान डोळे आणि सोंडेच्या आशीर्वादात्मक हालचाली वेडावून टाकणाऱ्या आहेत. मस्तकं रोपण शस्त्रक्रियेतला चमत्कारच म्हणायला हवा. 'गजानन' नावाचा हा किमेरा स्पेशल खूपच आवडला बुवा आपल्याला! – पॉझि.

न्यूट्रि, अगं जाहिरातीच्या खाली काहीतरी लिहिलेलं दिसतंय ते जरा नीट वाच बरं.– नॅनो

'प्रतिकारशक्तीची हमी, ग्राफ्ट रिजेक्शनची भीती नाही, स्थिर मानसिकतेची गॅरेंटी, मानवाला प्राप्त होतील

प्राण्यांची शक्तिस्थानं, प्राण्यांना प्राप्त होतील मानवाची शक्तीस्थानं. आमच्या वेब साइटला भेट द्या. www.varah.nic.in3257 – न्यूट्रि.

बघू या, जाहिरात करताहेत ते सगळं ठीक आहे, पण हे सगळं करत असताना माणसाचं व्यक्तिमत्त्व, त्याची आकलन शक्ती, त्याची कौशल्यं, त्याची वागणूक, त्याची मानसिकता आणि त्याचं स्वत्व शेवटी जपलं जाणार आहे का? कोण आहेत हे डॉक्टर्स? कुठे आहे ही फॅसिलिटी? संदर्भासाठी काही केस स्टडीज आहेत का? हे सगळं करण्याची कायदेशीर परवानगी आहे का? अशा प्रकारच्या मस्तक रोपणाच्या ऐतिहासिक घटना केव्हा आणि कशा घडल्या आहेत? ही सगळी माहिती जरा या वेब साईट वरून डाउनलोड करून घे म्हणजे रात्री मी निवांत बसून सगळं बघतो.– नॅनो.

***

ह्रित्विक अत्यंत धीम्या गतीने पाच वर्षांच्या कालावधीत उभं राहून चालण्यास असमर्थ झाला होता. पण तो सगळं खूपच धीराने घेत होता. या त्याच्या शारीरिक व्यंगाचं त्याने कधीच भांडवल केलं नाही. अविनाश आणि वैशाली सर्वतोपरी मदत करत होतेच. आता मात्र वॉकरचा सहारा घेऊन चालणंसुद्धा त्रासदायक झालं होतं. त्याच्याकडे आता जास्ती लक्ष द्यायला हवं होतं. ह्रित्विक निदान सध्या बोलूतरी शकत होता.

अनिकेत राजे बोलतोय; मी अविनाश यांच्याशी बोलू शकतो का ?

यस, अविनाश बोलतोय. अरे, अनिकेत मला अहो जाओ काय करतोएस! बोल, बोल, मोकळेपणाने बोल.

ह्रित्विकची प्रकृती काय म्हणते आहे?

तुला तर माहीतच आहे, हळूहळू स्नायू झिजत चालले आहेत. शरीरावरचा ताबा सुटत चालला आहे. लवकरच इलेक्ट्रॉनिक-रोबोटिक खुर्ची मिळेल. खास ऑर्डर देऊन तयार करून घ्यावी लागते ना!

हे बघ, माझी मुलगी सानिका नुकतीच अमेरिकेहून फिजिओथेरपी विषयात डॉक्टरेट करून भारतात परतली आहे. तिला अशा पेशंटना फिजिओथेरपी ट्रीटमेंट देण्याचा चांगला अनुभव आहे. किंबहुना त्यातच तिचं स्पेशलायझेशन आहे. ती या अतिशय गुंतागुंतीच्या आजाराविषयी चांगली जाणते. तिनेच ह्रित्विकची माझ्याकडे आस्थेवाईकपणे चौकशी केली होती. म्हणून म्हटलं तुझ्याशी एकदा बोलावं.

सानिका, इतकी मोठी केव्हा झाली; कळलंसुद्धा नाही आम्हाला. अरे अनिकेत, वसुंधरा वहिनींच्या म्हणजे सानिकाच्या आईच्या अकाली मृत्यूनंतर तू सानिकाला चांगलं वाढवलंस आणि मोठं केलंस. गेल्या पाच वर्षांपासून ह्रित्विकच्या प्रकृतीतच गुंतलो आहोत आम्ही. आपण असं करू की, त्याचे न्यूरोसर्जन डॉ. राजीव नाईक याच्या सोबत सानिकाची भेट निश्चित करूया.

ठीक आहे. मी वाट बघतो.

अविनाश सुद्धा चांगल्या फिजिओथेरपिस्टच्या शोधत होताच. सानिकाच्या हातात जर जादू असेल तर हा पर्याय अविनाश आणि वैशालीला सुद्धा आवडला होता.

मी डॉ. सानिका, आत येऊ का सर?

ये, बस, मी तुला ह्रित्विकची केस नीट समजावून सांगतो.

असं म्हणून डॉ. राजीव नाईक यांनी सगळ्या रिपोर्ट्स आणि फोटोजच्या आधारे तिला सगळी हिस्ट्री सांगितली.

सर, यासाठी सध्या अमेरिकेत 'स्पर्श' या थेरपीला विशेष प्राधान्य दिलं जातंय.

तुम्ही अगदी मुद्याचं बोललात, सानिका. या आजारात स्नायूंना ममतेचा स्पर्शा हवा असतो. मोकळेपणाने यावरती भारतात बोललं जात नाही. मला

वाटतं आपण उद्याच ही केस फिजिओथेरपिस्ट म्हणून हातात घ्यावी.

सानिका राजे, सरंजामे यांच्या घरात प्रविष्ट झाल्या झाल्या समोरच भव्य दिवाणखान्यात ह्रित्विक एका आराम खुर्चीत पडून असलेला दिसला. अतीशय लाघवी आणि देखणा चेहरा लाभलेला ह्रित्विक मानेच्या खाली मात्र संपूर्ण शरीराच्या स्नायूंचा ताबा हरवून बसला होता. गोऱ्यापान सडसडीत बांध्याच्या सानिकाने त्याच्याकडे बघून स्मितहास्य केलं आणि म्हणाली, 'मी सानिका. तुझी काळजी आजपासून मी घेणार.'

वेलकम सानिका, मी ह्रित्विक

इतक्यात अविनाश आणि वैशाली दिवाणखान्यात आले.

सानिका बैस, कशी आहेस तू. भारतात प्रॅक्टीस सुरू केली आहेस वाटतं.

नाही काका, अजून नाही. मी या क्षेत्रातल्या एखाद्या सेवाभावी संस्थेत रुजू व्हावं म्हणते आहे.

अरे वा ! छान आहे कल्पना. अनिकेत राजे माझा लहानपणापासूनचा मित्र आहे. त्याचा फोन आला आणि खूप हलकं वाटलं. तुझं डॉ. नाईकांशी सविस्तर बोलणं झालं असेलच. मग आता कशा पद्धतीने पुढे जायचं?

मी एक व्यावसायिक फिजिओथेरपिस्ट आहे. ह्रित्विकच्या बाबतीत सध्यातरी दिवसभरात माझी आठ तासांची उपस्थिती पुरेशी आहे. परंतु शरीरातल्या एक एक संस्था जशा दुबळ्या होत जातील तसं मग रोबोटिक चेअरला जोडलेल्या सगळ्याच कंट्रोल सिस्टिमवरती जसं की फुफ्फुसं, हृदय, अन्ननलिका याच्यावर बारकाईने लक्ष द्यावं लागेल. लुळ्या पडत जाणाऱ्या स्नायूंना विशिष्ट प्रकारच्या मसाजची नितांत आवश्यकता असते. अशा परिस्थितीत ह्रित्विकला रात्रंदिवस निरीक्षणाखाली असणं आवश्यक आहे.

घे अगं, छान पोहे केले आहेत.

'ह्रित्विक, छान पोहे केले आहेत आईंनी, बघ बरं, कसे झाले आहेत ते. चल, मी तुला भरवते.' असं म्हणून सानिकाने त्याच्या गळ्याभोवती हलक्या हाताने नॅपकीन गुंडाळला आणि प्रेमाने पोह्याचा घास भरवला. पोहे संपल्यावर पाणी पाजलं आणि त्याच्या पाठीवर प्रेमाने मायेचा हात फिरवला. इतक्या दिवसांपासून चिंतेची किनार असलेल्या ह्रित्विकच्या चेहऱ्यावर आश्वासकतेची लहर उमटलेली वैशाली आणि अविनाशच्या नजरेने टिपली होती.

एक वर्ष होऊन गेलं. ह्रित्विकला सानिकाचा सहवास हवाहवासा वाटू लागला होता. सानिका सुद्धा ह्रित्विकची विशेष काळजी घेत होती. ह्रित्विक एक दिवस आपल्या खोल गेलेल्या आवाजात काहीतरी पुटपुटत होता आणि आपलं डोकं सानिकाच्या वक्षस्थळावर टेकवून, डोळे मिटून तो शांत पडून होता. सानिकाने त्याच्या डोक्यावरून मायेने हात फिरवला. ह्रित्विकच्या चेहऱ्यावर इतकं समाधान सानिका प्रथमच बघत होती. सनिकाला अश्रू आवरणं अनावर झालं होतं. अविनाश आणि वैशाली हे दृश्य बघून क्षणभर थबकलेच. दोघांनी आपल्या चष्म्याआडून अश्रुंना वाट मोकळी करून दिली होती.

अनिकेत राजे बोलतोय.

बोल अरे, काय म्हणतोस? कसं चाललं आहे तुझं? सानिका ह्रित्विकची खूप छान काळजी घेते बरं का!

कसं बोलू कळत नाहीये रे अविनाश, प्रत्यक्ष येऊन भेटून बोलण्याची हिम्मत होत नाहीये, आणि फोनवर सुद्धा विषय कसा काढावा कळत नाहीये.

बोल अरे, त्यात काय आढेवेढे घेतो आहेस. फोनवर विषय प्रवेश कर आणि प्रत्यक्ष भेटून विस्ताराने सांग. बोल.

काल सानिकाने ह्रित्विकशी विवाह करण्याची इच्छा बोलून दाखवली आहे. मी तर पार संभ्रमात

पडलो आहे. .........., अरे कसं शक्य आहे ते ?

........................., मी तरी काय बोलू राजे,. हो... , काल घडलंही तसंच. सानिका ही फार परिपक्व आणि हुशार मुलगी आहे. समाजकार्यासाठी वाहून घेणारी आहे. तिच्या इच्छेचा आपण आदर करायला हवा असं मला वाटतं.

ठीक आहे. आजच संध्याकाळी आपण तुझ्याकडे भेटू या.

सरंजामे आणि राजे कुटुंब यांची सरंजामे यांच्या घरी या विषयावर विस्ताराने चर्चा झाली. सानिका आणि ह्वित्विक यांनी पुढाकार घेऊन समजून उमजून, भविष्यातले धोके जाणून घेऊन हा निर्णय घेतला होता. अत्यंत साधेपणाने घरीच लग्न पार पडलं. लग्नाला डॉ. राजीव नाईक हे हजर होते.

ह्वित्विक हळूहळू रोबोटिक चेअरवर पूर्णतः अवलंबून राहू लागला होता. त्याच्या मानेच्या खालील भागाचा लोळगोळा झाला होता. बोलणंसुद्धा बंद झालं होतं. रोबोटिक चेअरवरची बटनं एका बोटाच्या कृत्रिम हालचालीने दाबून तो कसाबसा संवाद साधत होता.

सानिका, आपल्याला पुढच्याच महिन्यात व्हिएन्नाला जायचं आहे.-डॉक्टर राजीव नाईक

सर, काही विशेष? - सानिका

'हेड ट्रान्सप्लांट'च्या शस्त्रक्रियेला मान्यता मिळण्याची दाट शक्यता आहे. या क्षेत्रातले दिग्गज तिथे होणाऱ्या तीन दिवसांच्या कार्यशाळेत काही प्रात्यक्षिकं दाखवणार आहेत. ह्वित्विकची भविष्यातली उपचार पद्धती आपल्याला निश्चित करायला या कार्यशाळेची फार मदत होणार आहे.

ओके सर, मी या बाबतीत तुम्हाला लवकरच भेटते. आपल्याला वेगाने हालचाली करून निर्णय घ्यायलाच हवा. जीनथेरपी म्हणावी तशी काम करत नाहीये.

या कार्यशाळेत ह्वित्विकची केस आपल्याला सादर कराची आहे. आपलं सादरीकरण संयोजकांनी मान्य केलं आहे. त्याच्यावर शेवटचा हात फिरवायचा आहे. मला लवकर भेट.

आतापर्यंत तरी 'हेड ट्रान्सप्लांट'च्या शस्त्रक्रियेला मान्यता मिळालेली नव्हती. त्यातले अनेक प्रश्न अजून अनुत्तरीतच होते. डॉ. नाईक आणि डॉ. सानिका व्हिएन्नात दाखल झाले होते.

'मला हे जाहीर करायला खूप आनंद होत आहे की, डॉ. मार्सेलो रोमानो यांनी सादर केलेल्या 'हेड ट्रान्सप्लांट' शस्त्रक्रियेला यूरोपियन युनियन ऑर्गन ट्रान्सप्लांट सल्लागार मंडळाने मान्यता दिली आहे. या संदर्भातले एथिकल, लीगल, सायकॉलॉजीकल आणि फिजिओलॉजिकल प्रश्न सोडवण्यात ते यशस्वी झाले आहेत. समितीने असं निश्चित केलं आहे की, जगातली पहिली ऐतिहासिक 'हेड ट्रान्सप्लांट' शस्त्रक्रिया भारतातल्या ह्वित्विक सरंजामे या रोग्यावर करण्यात येईल.'

यूरोपियन मेडिकल असोसिएशनच्या गॅझेटमधे मस्तक रोपण शस्त्रक्रियेसंबंधी एथिकल, लीगल, सायकॉलॉजीकल आणि फिजिओलॉजिकल कन्सर्न्स स्पष्टपणे जाहीर केले होते. भारतात जाऊन त्याचा बारकाईने अभ्यास करणं अत्यावश्यक होतं.

भारतात परतल्यावर इंडियन मेडिकल असोसिएशन समोर तज्ज्ञ डॉक्टर्स, विधिज्ञ, समाजशास्त्रज्ञ आणि मानसशास्त्रज्ञ यांची एक खास सभा बोलवण्यात आली होती. यूरोपियन मेडिकल असोसिएशनच्या गॅझेटचा सखोल अभ्यास करून त्यांनी आपली मतं सभेसमोर मांडली. डॉक्टर सानिका आणि डॉक्टर नाईक यांनी ही सभा बोलावली होती. शस्त्रक्रिया क्षेत्रातली ही महत्त्वपूर्ण घटना नोंदवली जाणार होती. सभेत खालील मुद्दे मांडले गेले.

ब्रेन डेड झालेली व्यक्ती ही आपलं शरीर दान करणार होती. म्हणजे ही व्यक्ती दात्याच्या भूमिकेत

असणार होती. या व्यक्तीच्या नातेवाईकांचा भविष्यात या शरीरावर कुठलाही कायदेशीर हक्क असणार नव्हता.

विकलांग व्यक्ती ही घेत्याच्या भूमिकेत असेल. या व्यक्तीचे मस्तक दात्याच्या शरीरावर रोपित करण्यात येईल.

यातून निर्माण झालेल्या जीवंत व्यक्तीवर विकलांग व्यक्तीच्या म्हणजे घेत्याच्या नातेवाईकांचा कायदेशीर हक्क असेल.

दात्याचं शरीर मात्र ह्तित्विक म्हणेल तसं वागेल. दात्याच्या काहीच आठवणी तिथे शिल्लक राहणार नाहीत. रोपण झाल्यावर दात्याच्या कुटुंबातील व्यक्तींना तो ओळखणार सुद्धा नाही. कारण मेंदू ह्तित्विकचा असेल.

ही शस्त्रक्रिया करण्यापूर्वी दाता आणि घेता यांच्यातील जैविक फरक बारकाईने जाणून घेतला जाईल. नंतरच शस्त्रक्रियेचा निर्णय घेतला जाईल.

दाता आणि घेता यांच्या शरीरात रक्त पुरवठा, प्राणवायू आणि खाद्य सतत प्रवाही ठेवण्यासाठी आणि तयार झालेले विषारी पदार्थ शरीरातून बाहेर टाकण्यासाठीची यंत्रणा चांगली विकसित झाली आहे.

दाता आणि घेता यांच्या शरीरातली ऑटोनॉमस नर्व्हस सिस्टिम स्वायत्त मज्जासंस्था जी की श्वास आणि हृदयाचे ठोके नियंत्रित करते त्याचे सुद्धा उत्तम नियोजन केलेले आहे.

दाता आणि घेता यांच्या मेरूदंडाच्या जोडणी-तंत्रज्ञानात जुन्या तंत्रज्ञानाला 'फॉस्फोरिलकोलीन' हा उत्तम नवा पर्याय सापडला आहे.

या शस्त्रक्रियेमुळे होणाऱ्या वेदनांवरसुद्धा रामबाण उपाय उपलब्ध झाला आहे.

ही शस्त्रक्रिया करायला काही हरकत नाही, हा धोका पत्करायला काही हरकत नाही. असाच सभेचा सूर होता. तसा निर्णय घेऊन सभा संपली.

सानिका, ही शस्त्रक्रिया करायचा आपण निर्णय तर घेतला आहे. माझ्या पोटचा गोळा तुझ्याकडे सोपवला आहे मी. पण.... सगळं नीट पार पडेल ना? - वैशाली

हा धोका आपल्याला पत्करावा लागेल आणि आपल्या समोर दुसरा चांगला पर्यायसुद्धा मला दिसत नाहीये. आई, अहो तुमची काळजी मी समजू शकते. पण मी सुद्धा त्याची अर्धांगिनी आहे ना ! - सानिका

सानिका, तू जाणकार आहेस. त्याच्याशी लग्न करण्याचं धाडस दाखवलंस आणि आता तुझ्यावर हा दुसरा धाडसी निर्णय घेण्याची वेळ आली आहे. बेटा, तुझ्या स्थिर आणि निश्चल स्वभावाचं खरोखर मला कौतुक वाटतं - अविनाश

४ जानेवारी २०५३ रोजी निश्चित झालेल्या मस्तक रोपण शस्त्रक्रियेसाठी डॉक्टर नाईक, डॉक्टर सानिका आणि ह्तित्विक व्हिएन्नाला रवाना झाले.

***

नॅनो हॉस्पिटल मधून घरी परतला होता. रात्रीचं जेवण आटोपून त्याने न्यूट्रिला आठवण करून दिली. न्यूट्रिने डाउनलोड केलेली फाइल नॅनोला केव्हाच पाठवली होती.

फाइल उघडताच संकरीत जमातीचा अध्यक्ष नर-वराह बोलत होता :

'कंटाळा आला आहे त्याच त्या मानवी शरीराचा, वागणुकीचा, व्यक्तिमत्त्वाचा आणि नातेसंबंधांचा. पुरे झाला तो परिपूर्ण आयुष्य जगण्यातला आनंद. मानवाने मानवावरच मस्तक रोपण शस्त्रक्रिया तर यशस्वी करून दाखवली. त्यातून नवनवीन व्यक्तिमत्त्व जगायला मिळाली, नवनवीन कौशल्यं शिकायला मिळाली, अनुभवायला मिळाली. सौंदर्य, देखणेपणा, रोगमुक्ती, तृप्ती, समाधान सगळं अनुभवून झालं. आता या पूर्णत्वातून सुद्धा मानवाला हवी होती सुटका.' अध्यक्ष नर-वराह बोलत होता. 'मानवाला आता याच जन्मात अनुभवायचं होतं प्राणी जीवन. त्याला प्राणिमात्रांशी संकर हवा

होता. मानव-प्राणी संकरीत जमात पृथ्वीवर जन्माला घातल्याशिवाय त्याला अपूर्णत्वातली मजा चाखता येणार नव्हती. याला पृथ्वीवासीयांकडून खूप टोकाचा विरोध झाला. एक रोगोपचार पद्धती म्हणून मानवी मस्तक रोपणाला अधिकृत मान्यता देण्यात आली होती. परंतु मानव-प्राणी संकर शस्त्रक्रियांना मान्यता एकमुखाने नाकारण्यात आली होती. अखेर दक्षिण पॅसिफिक समुद्रात न्यू झीलंडच्या जवळ ब्रिटिशांच्या मालकीचं 'आइतुताकी' हे बेट मानव-प्राणी संकरीत जमातीसाठी सुरक्षित ठेवण्यात आलं. आमच्या सगळ्या प्रजाती नर-वानर, नर-सिंह, नर-अश्व, नर-वराह, नर-अस्वल, नर-गर्दभ, नर-ऋषभ, नर-गज, मत्स्यगंधा, सर्पगंधा आणि अशा कितीतरी जमाती या बेटावर गुण्यागोविंदाने वास्तव्य करताहेत. पृथ्वीवरच्या अत्यंत बुद्धिमान स्त्री-पुरुषांनी असा संकर करून घेतला असल्यामुळे आम्ही 'सुपर सुपर किमेरा' जन्माला घालून एक चमत्कार घडवून आणला आहे. या बेटावर आम्ही लोकशाही पद्धतीने व्यवहार करतो. आमची एक स्वतंत्र आचारसंहिता आहे. नवकल्पना आणि नवोन्मेष यांचा आविष्कार या बेटावर बघायला मिळतो.

आमचं स्वतःचं अवकाश उड्डाण केंद्र आहे, आमची अवकाश प्रयोगशाळा आहे, आमचं अवकाश हॉस्पिटल आहे. आम्ही शस्त्रक्रिया अवकाशातच करतो.

आता हा बघा व्हिडिओ.

नॅनो हा व्हिडिओ बारकाईने बघू लागला.

ऑपरेशन थिएटर मध्ये 'नर-गज'म्हणजे 'गजानन' हे प्रमुख सर्जन होते. नर-वानर आणि नर-सिंह हे त्यांचे सहकारी सर्जन होते. नर-अश्व, नर-वराह आणि नर-श्वान हे सेवक होते तसेच मत्स्यगंधा, सर्पगंधा आणि मार्जारगंधा या सेविका होत्या. एका मोठ्या टबमध्ये गर्दभाचं मस्तक धडावेगळं करून त्यात द्रवरूप नायट्रोजन टोचलेला होता. दुसऱ्या टब मध्ये मानवाचं धड द्रवरूप नायट्रोजनमध्ये बुडवून ठेवलं होतं. अत्यंत व्यावसायिक पद्धतीने आणि सफाईदारपणे रोबोटिक सर्जरी सुरू झाली होती. डॉ. गजानन यांनी सुपर संगणकावर बसून सहकारी आणि सेविकांच्या सहाय्याने त्या २४० मायक्रो आणि ११ मॅक्रो सर्जरीज मोठ्या कौशल्याने पार पाडल्या होत्या. दर २४ तासांनी होणारी प्रगती मुद्दाम दाखवण्यात आली होती. एक महिन्याची पोस्ट-सर्जरी ट्रीटमेंट घेऊन तो नर-गर्दभ जेव्हा उठून चालायला लागला, कान टवकारायला लागला, प्रतिसाद देऊ लागला, डॉक्टरांशी हस्तांदोलन करू लागला तेव्हा हे सगळं बघून नॅनो, पॉझि आणि न्यूट्रि थक्क झाले होते.

न्यूट्रि बेटा, आत्ता बोलतांना नर-वराह या अध्यक्षांनी पहिल्या मानवी मस्तक रोपणा संबंधी उल्लेख केल्याचं मी ऐकलं. बघतेस का जरा मानवी मस्तकाचं मानवाच्याच शरीरावर रोपण केलेली ती ऐतिहासिक पहिली सर्जरी. - नॅनो

बघते, यांच्या साइटवर नसेल तर दुसऱ्या साइटवरून सर्फिंग करून शोधून काढते. - न्यूट्रि

नॅनो, यस ! आय गॉट इट . ह्रित्विक सरंजामे नावाच्या पेशंटवर व्हिएन्नाच्या डॉ. मार्सेलो रोमानो यांनी ४ जानेवारी २०५३ या दिवशी ही शस्त्रक्रिया प्रथमच यशस्वीपणे पार पडल्याचं म्हटलं आहे.

सुरू कर बरं व्हिडिओ ..........

***

रोबोटिक चेअरवर विकलांग अवस्थेत बसलेला ह्रित्विक. चेअरला ढकलत ढकलत धीम्यागतीने पावलं टाकत सानिका पुढे सरकत होती. डॉक्टर नाईक सानिकाच्या मागून कुण्या एका डॉक्टरशी चर्चा करत तिघेही हॉस्पिटलच्या भव्य कॉरिडॉरमध्ये प्रविष्ट झाले. एका खोलीत प्रथम सगळ्या औपचारिकता पूर्ण करण्यात आल्या. नंतर एका अत्याधुनिक लाईफ सपोर्ट सिस्टिमने युक्त अशा खोलीत ह्रित्विकला ॲडमिट करून घेण्यात आलं. ठरल्यानुसार प्री-ऑपरेटीव्ह चाचण्या घेण्यासाठी ह्रित्विकचे नमुने घेण्यात आले.

रोबोटिक ऑपरेशन थिएटरमध्ये तीन सुपरसंगणकांवर तीन सर्जन्स स्थानापन्न झाले होते. ह्रित्विकचं मस्तक आणि दात्याचं शरीर ही दोन्ही प्रथम द्रवरूप नायट्रोजन मध्ये उणे १९६ डि.से. तापमानाला प्राणवायुचा अभाव असलेल्या चेंबरमध्ये काही काळ जीवंत राहतील अशी व्यवस्था केली होती. ही संपूर्ण सर्जरी अतिशीत तापमानाला केली जात होती. त्यानंतर दोघांच्याही मानेजवळच्या उतींची कापणी करून त्यातल्या प्रमुख रक्तवाहिन्या एकमेकांशी काही नलिकांच्या सहाय्याने जोडल्या गेल्या. प्रथम रक्त प्रवाह अबाधित राहील अशी व्यवस्था केली गेली. आता दोन्ही शरिरांचे मेरूदंड कापून काढले गेले. विलंब न लावता संगणकाच्या हातांनी मेरूदंडातले मज्जारज्जू एकमेकांपासून सफाईने वेगळे केले. दोन्ही मस्तकातले हे मज्जारज्जूचे जुडगे एकमेकाला जुळवणं हीच खरी कसोटी होती. यासाठी त्यांना प्रथम बायो-क्लिप्सच्या सहाय्याने तात्पुरतं जोडून घेण्यात आलं. हे मज्जारज्जू एकमेकांमध्ये विलीन झाल्यासारखे जोडले जावेत यासाठी 'फॉस्फोरिलकोलीन' या नव्याने शोधू काढलेल्या रसायनचा वापर केला गेला. हे मज्जारज्जूचे जोड या रसायनात बराचवेळ बुडवून ठेवण्यात आले. या रसायनचे तापमान वाढवून हे मज्जारज्जूचे धागे वितळून एकमेकांना घट्ट चिटकून बसतात आणि मज्जारज्जूचे हवेतसे जाळे निर्माण करता आले.

आता मस्तकाच्या आणि शरीराच्या स्नायूंचा, त्वचांचा आणि रक्तवाहिन्यांचा एकमेकांशी मेळ घालण्याची प्रक्रिया मायक्रो सर्जरीद्वारा करण्यात आली. संगणकाच्या जलद हालचालींमुळे काही तासात या सर्जरीज पार पडल्या. यासाठी मस्तक आणि शरीर स्थिर राहील, त्यांची हालचाल होणार नाही याची काळजी घेण्यासाठी हा जीव कोमात ठेवला गेला. श्वासोच्छ्वास, रक्ताभिसरण आणि पचनक्रिया बिनबोभाट पार पडल्या तरी शरीराची हालचाल होऊ दिली गेली नाही. मेंदू सुप्तावस्थेत असल्यामुळे मज्जारज्जूंवर ताणही पडला नाही. मेंदूचं रोपण म्हणजे डोळे, नाक, कान, जीभ आणि त्वचा या पाच ज्ञानेंद्रियांचं प्रत्यारोपण करावं लागतं. हे सगळं करत असताना प्रतिकारकयंत्रणा कमकुवत होऊ न देणं ही सगळ्यात मोठी जोखीम असते. शस्त्रक्रिया यशस्वी झाली होती. मानवी मेंदूने निर्माण केलेल्या सॉफ्टवियरमुळे संगणकाने वेळेच्या आत ही शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केली होती.

ही खूप गुंतागुंतीची शस्त्रक्रिया असूनसुद्धा काही तासात पार पाडावी लागते. डॉ. मार्सेलो रोमानो हे अत्यंत प्रसन्न चेहऱ्याने शस्त्रक्रिया संपवून बाहेर पडत होते. पत्रकारांनी त्यांना काचेच्या खिडकीबाहेरूनच प्रश्न विचारायला सुरुवात केली होती. त्यांनी फक्त उजव्या हाताचा अंगठा उंचावून यशस्वितेची हमी दिली होती.

मिस्टर रॉबर्ट या ४० वर्षांच्या तरुणाच्या धडावर ह्रित्विकचं मस्तक बेमालूमपणे साकारलं जात होतं. शरीरातली एक एक यंत्रणा मेंदूच्या नियंत्रणात येत होती. पंचज्ञानेंद्रियं प्रतिसाद देत होती. स्वायत्त मज्जासंस्था नियंत्रणात होती.

आज सहा महिन्यांच्यावर काळ लोटला होता. 'ह्रित्विकचा हॉस्पिटलमधून डिस्चार्ज' ही जागतिक बातमी माध्यमांवर झळकली होती. हजारो कॅमेरे हॉस्पिटलच्या लॉनवरती खिळलेले होते. सरंजामे आणि राजे कुटुंब डोळ्यांत प्राण ओतून ह्रित्विकला टीव्ही स्क्रीनवर बघायला आतुर झाले होते. सकाळी दहाची वेळ होती. रॉबर्टचं शरीर लाभलेला ह्रित्विक स्वतःच्या दमदार पायांवर उभा राहून, आत्मविश्वासाने पावलं टाकत लॉनवरती अवतरला. समोरून परिकथेतली राजकुमारी शोभावी असा पेहेराव करून सानिका अवतरली. ह्रित्विकने सानिकाला आपल्या बाहुपाशात घेतलं, तिचं त्रिवार चुंबन घेतलं. दोघांनी उपस्थितांना वाकून नमस्कार केला... आणि नियोजित हेलिकॉप्टरने भारतासाठी व्हिएन्न इंटरनॅशनल एअरपोर्टकडे प्रयाण केलं होतं.

**– डॉ. रंजन गर्गे**

●●●

# जपानची ओळख

*'उगवत्या सूर्याचा देश' म्हणून ओळखला जाणाऱ्या जपान देशाची ओळख या लेखात करून देण्यात आली आहे - संपादक*

'明けない夜はない'.'आकेनाई योरू वा नाई' असे या वाक्याचे वाचन. याचा अर्थ असा की, 'प्रत्येक रात्रीचा शेवट होतोच!' आयुष्यात काळ्या ढगांचे कितीही सावट आले तरीही आभाळामागील प्रखर सूर्याच्या आशेवर आपण जगतो. हे जपानच्या बाबतीत तंतोतंत लागू पडते. १९४५ मधील अणुबॉम्ब हल्ला असो, सतत उद्भवणारे भूकंप असोत, ज्वालामुखी असोत वा त्सुनामी. प्रत्येक संकटातून मार्ग काढत हा देश पुन्हा उभा राहतो. सुरक्षित भविष्याचा विचार करून योग्य कृती करणाऱ्या आणि काळाच्या दोन पावलं पुढेच चालणाऱ्या या 'जपान' विषयी काही मूलभूत गोष्टी जाणून घेऊ या.

जपानचे पूर्वीचे नाव 'निप्पोन' आणि सध्याचे 'निहोन'. दोन्ही नावांचा शब्दशः अर्थ 'सूर्याचा उगम' असा होतो. त्यामुळे याचे भाषांतर 'उगवत्या सूर्याचा देश' असे केले जाते. जपानी भाषेतील कांजी (चिनी/जपानी भाषेतील वर्ण) वापरून हे शब्द लिहिले जातात. यासाठी वापरण्यात येणारी कांजी 日本 , (निप्पोन/निहोन) लक्षात घेता याचा अर्थ समजून घेणे सोयीचे होते. '日' चा अर्थ 'सूर्य' तर '本' चा अर्थ 'मूळ, उगम' असा आहे. जपानचे भौगोलिक स्थानही अतिपूर्वेकडील असल्यामुळे जपानला 'उगवत्या सूर्याचा देश' असे संबोधले जाते.

६ ऑगस्ट १९४५ आणि ९ ऑगस्ट १९४५ रोजी अनुक्रमे हिरोशिमा आणि नागासाकीवर अमेरिकेद्वारे करण्यात आलेल्या अतिविध्वंसक अणुबॉम्ब हल्ल्यात जपान देश पूर्ण उद्ध्वस्त झाला. लाखो निष्पाप लोकांनी आपले प्राण गमावले व ज्यांचा जीव वाचला त्यांना कायमचे अपंगत्व आले.जपान पूर्णतः कोलमडून गेला. पण जपानने मार्ग काढत, या हल्ल्यातून उभे राहत विस्कळीत जनजीवन, अर्थव्यवस्था हळूहळू पूर्वपदावर आणली. म्हणूनच अमरत्व आणि पुनर्जन्माचे प्रतिनिधित्व करणाऱ्या 'फिनिक्स' पक्ष्याची उपमा जपानला दिली जाते.

जपान प्रशांत महासागरातील एकूण ६८५२ बेटांवर वसला असून होन्शू, क्यूशू, शिकोकू आणि होक्काइदो ही प्रमुख ४ बेटे आहेत. टोकियो ही जपानची राष्ट्रीय राजधानी असून जपानमधील हे सर्वात मोठे शहर व जगातील सर्वात मोठे महानगर आहे. सुमारे १२.६३ करोड लोकसंख्या असलेल्या जपानचा लोकसंख्येच्या बाबतीत जगात १० वा क्रमांक लागतो. औद्योगिकदृष्ट्या प्रगत जपानच्या अर्थव्यवस्थेचा जगात ३ रा क्रमांक आहे. 'जपानी' ही येथील अधिकृत भाषा असून 'येन' हे राष्ट्रीय चलन आहे. बौद्ध व शिन्तो हे येथील मुख्य धर्म आहेत. 'किमोनो' व 'युकाता' हा जपानचा पारंपरिक पोशाख आहे. पूर्वीच्या काळी लोक याच पोशाखात दिसायचे, परंतु आधुनिक काळात दैनंदिन जीवनात हे परिधान न करता विशेष कार्यक्रमाप्रसंगी हे परिधान केले जातात.

थंड व दमट हवामान असलेल्या जपानचे 'भात' हे प्रमुख पीक आहे. सतत होणाऱ्या भूकंपांमुळे येथील भूमी बऱ्याच प्रमाणात लाव्हारसापासून बनलेली असल्याने शेती फारच कष्टाची ठरते. शेतीसह मत्सोद्योग हा येथील प्रमुख व्यवसाय आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर मत्सोद्योगात जपानचा दुसरा क्रमांक लागतो. सामन

(Salmon) व टुना (tuna) हे येथील प्रमुख मासे असून इतरही विविध प्रकारचे मासे येथे पाहायला मिळतात.

जपान म्हटलं की निसर्गसौंदर्य लगेचच डोळ्यांसमोर उभं राहतं. साधारण मार्च ते एप्रिल दरम्यान जपानने आकर्षक गुलाबी आणि सफेद रंगांच्या फुलांनी स्वतःला लपेटून घेतलेलं असतं. ही मनमोहक फुलं म्हणजेच 'साकुरा' (चेरी फुलांचा बहर). महत्त्वाची बाब म्हणजे या झाडाला फळं लागत नाहीत; तर प्रत्येक वसंत ऋतूमध्ये हे झाड सुंदर फुलांनी बहरते व जपानचे सौंदर्य आणखी खुलते. साकुरा केवळ एक किंवा दोन आठवड्यांपर्यंत बहरते. आपले आयुष्य किती छोटं आणि मौल्यवान आहे याची जाणीव ते आपल्याला करून देते.

साकुरा नंतर ज्याचं नाव जपानशी जोडलं जातं तो म्हणजे 'फुजी पर्वत'. पर्वत या शब्दासाठी वापरण्यात येणाऱ्या कांजीचा उच्चार 'सान' असा होतो. त्यामुळेच 'फुजीसान' म्हणून ओळखला जाणारा हा पर्वत जपानमधील सर्वोच्च पर्वत म्हणून प्रसिद्ध आहे. याची उंची ३७७६ मीटर आहे. १७०७ मध्ये शेवटचा ज्वालामुखी उद्रेक झाल्यानंतर ही ज्वालामुखी सुप्त झाली, पण भौगोलिक अजूनही याची गणती 'सक्रिय ज्वालामुखी' म्हणून करतात.

जपानच्या प्रत्येक गोष्टीत काहीतरी वेगळेपण व नावीन्य असते. उदाहरण म्हणजे मूळतः जपानची असलेली संकल्पना 'इकिगाई' जी सध्या सर्वत्रच चर्चेत आहे. 'इकिगाई' म्हणजे जीवन जगण्याचा उद्देश. प्रत्येकाच्या अस्तित्वाचं एक विशिष्ट कारण असतं. जपानमधील बहुतांश लोक १०० पेक्षा जास्त वयोगटातील आढळतात, कारण त्यांना त्यांचा 'इकिगाई' मिळालेला असतो असे मानले जाते. 'इकिगाई' या पुस्तकातील वाचनात आलेल्या ओळी लिहून या लेखाचा शेवट करावासा वाटतो–

'प्रत्येकाच्या अंतरंगामध्ये एक इकिगाई दडलेला असतोच आणि त्याला शोधण्यासाठी संयमाची आवश्यकता असते. एकदा का तुम्हाला तुमचा इकिगाई स्पष्ट झाला, की सुख आणि समाधान प्राप्त होतं. त्याचप्रमाणे जीवनाला खरा अर्थ प्राप्त होतो. दीर्घायुषी, निरोगी आणि आनंदी जीवनाचं रहस्य म्हणजे इकिगाई.'

**– गौरी अंबाजी परब**

●●●

(पृष्ठ क्र. १६ वरून - **आवर्जून वाचावं असं काही : रिचर्ड एल्मनचे 'फोर डब्लिनर्स'**)

पण या सर्वांतून त्याला अनुभवाच्या तळाशी पोहोचता येतं, वरवरचा आविर्भाव आणि भूमिका टाळून खोल जाता येतं. बेकेटचा सर्वात मोठा प्रयोग होता तो भाषेबरोबर. जॉयसनेही भाषेबरोबर प्रयोग केले. पण या दोघांमधे फरक आहे. जॉयस नवे शब्द शोधत भाषेचा सर्वाधिक वापर करतो आणि भाषेचा विस्तार करतो. बेकेट याच्या एकदम विरुद्ध करतो. तो भाषेचा कमीतकमी वापर करतो आणि असं करून भाषेला आक्रसत नेतो. मानवी अस्तित्वाच्या अगदी गाभ्यापर्यंत पोहोचण्याचा बेकेटचा हा लोकविलक्षण उपाय आहे. बेकेटला सर्व प्रकारच्या ढोंगांची चीड आहे आणि ती त्याच्या अल्पाक्षरी लेखनातून सतत जाणवत राहते.

एल्मन या पुस्तकात वाचकांची; चार प्रतिभावंत लेखकांच्या साहित्य आणि जीवनात अतिशय मनोरम आणि विचारप्रवर्तक सफर घडवून आणतो. हे पुस्तक वाचून आपल्याला नवी दृष्टी मिळते हे निश्चित.

**– डॉ. आनंद कुलकर्णी**
इंग्रजी विभाग प्रमुख
ग्रामोन्नती मंडळाचे कला विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, वारुलवाडी, नारायणगाव
ता. जुन्नर, जि. पुणे– ४१०५०४

●●●

# परिसर वार्ता

- संकलित

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

**सौ. आनंदीबाई केशव जोशी शाळेत ऑनलाईन प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन**

दरवर्षी प्रजासत्ताक दिन २६ जानेवारी रोजी साजरा केला जातो. यावर्षी सौ. ए. के. जोशी शाळेच्या प्राथमिक विभागातील इयत्ता १ली ते ४थीच्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन माध्यमातून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरवात राष्ट्रगीताने झाली. इयत्ता २ रीच्या विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक दिनाची माहिती देऊन महत्त्व सांगितले.

इयत्ता १लीच्या विद्यार्थ्यांनी 'राष्ट्रीय चिन्हें' हा विषय घेऊन, राष्ट्रीय फूल- कमळ, राष्ट्रीय प्राणी- वाघ, राष्ट्रीय फळ- आंबा अशा विविध विषयांवर माहिती दिली.

देशभक्तीवर गीतांचे एकसुरात गायन करण्यात आले.

तसेच, देशभक्तीवर विविध नृत्यांचे सादरीकरण करण्यात आले.

प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी 'भारत' या विषयावर निरनिराळी चित्रे काढून रंगविली व त्यांचे सादरीकरण करण्यात आले.


'फ्रंटलाइन वर्कस्-अवर हिरोज' या विषयावर भाषण केले व त्यांच्या कामगिरीबद्दल आदर करून त्यांचे आभार मानले.

अशा प्रकारे 'प्रजासत्ताक दिन' मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

**पुरुषांच्या मानसिकतेत बदल घडवून आणणे आवश्यक : डॉ. विनय सहस्रबुद्धे**

**शाश्वत विकासासाठी महिलांचे सक्षमीकरण आवश्यक: डॉ. नीलम गोऱ्हे**




विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी-बेडेकर कला व वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयाचा राज्यशास्त्र विभाग व रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने 'महिला राजकीय नेतृत्वः वैश्विक ते स्थानिक आव्हाने व संधी' या विषयावर एक दिवसीय ऑनलाइन राष्ट्रीय परिषद बुधवार, १२ जानेवारी २०२२ रोजी पार पडली. या परिषदेत राज्यसभा खासदार डॉ. विनय सहस्रबुद्धे विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, ज्येष्ठ अर्थ व शिक्षणतज्ज्ञ डॉ. विभूती पटेल, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, मुंबईच्या माजी

महापौर डॉ. शुभा राऊळ, भाजप राज्य उपाध्यक्ष माधवी नाईक, महिला राजसत्ता आंदोलनाचे भीम रासकर, मुंबई विद्यापीठाच्या मानव्यविद्या विभागाचे अधिष्ठाता डॉ. राजेश खरात, मुंबई विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे डॉ. मृदुल निळे हे मान्यवर उपस्थित होते. कोरोना महामारीची पार्श्वभूमी लक्षात घेत ही परिषद ऑनलाइन झूम आणि यूट्युब या माध्यमांवर प्रक्षेपित करण्यात आली.

परिषदेचे उद्घाटन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि सरस्वती वंदनेने झाले. त्यानंतर महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर यांनी मान्यवरांची थोडक्यात ओळख करून दिली. तसेच, 'स्वातंत्र्यानंतरच्या काळातील स्त्रियांचा राजकीय सहभाग' या बद्दल आपले मत मांडले. याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक म्हणाल्या की, भारतीय महिला ही निराळी असून तिच्यात नेतृत्वाची भूमिका उत्तमरित्या बजावण्याचे सामर्थ्य आहे. ज्येष्ठ कवयित्री अमृता प्रीतम यांच्या ओळींचा संदर्भ देत त्यांनी भारतातील स्त्री-शक्तीच्या नेतृत्वगुणांचा उल्लेख केला.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी राज्यसभा खासदार व संसदीय स्थायी समिती अध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी 'स्त्रियांची सामाजिक भूमिका' यावर भाष्य केले. वेदकाळातील मैत्रेयी, गार्गी व रामायण-महाभारतातील सीता व द्रौपदी यांच्या व्यक्तिरेखेचा त्यांनी संदर्भ दिला. ते म्हणाले की, 'इतर देशांच्या तुलनेत भारत हा महिलांच्या पुढाकारात सुरुवातीपासूनच अग्रेसर आहे. तसेच भारतीय महिला या प्राचीन काळापासूनच सामाजिक नेतृत्वाची भूमिका प्रभावीपणे बजावत आल्या आहेत. तर अलीकडच्या काळात काही दशकांपासून स्त्रियांच्या अवस्थेला हा समाज जबाबदार आहे, कारण पुरुषांच्या परंपरागत मानसिकतेच्या परिवर्तनाकडे दुर्लक्ष होत आले आहे.' ज्येष्ठ सर्वोदयी नेते दादा धर्माधिकारी यांचा उल्लेख करत 'वैचारिक परिवर्तनाशिवाय स्त्री-पुरुष समानता पूर्णत्वाला जाऊ शकणार नाही' असे त्यांनी प्रतिपादन केले. 'तसेच विवाहाचे वय २१ वर्षे करावे या सरकारी विधेयकाबद्दल चर्चा करण्यासाठी समितीमध्ये स्त्रियांचा पुरेशा समावेश नाही अशी आवई उठली होती. मात्र जोपर्यंत पुरुषांच्या परंपरागत मानसिकतेत बदल होणार नाही तोपर्यंत त्यांच्या सामाजिक स्थानात बदल होणार नाही. त्यासाठी गतिशीलतेने व परिणामकारकतेने मानसिक परिवर्तन करण्याची गरज आहे' असे ते म्हणाले. यानंतर रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी यांच्या संशोधन अहवालाचा संदर्भ देत डॉ. सहस्रबुद्धे यांनी महिलांच्या राजकीय क्षेत्रातील प्रभावाबद्दल मत मांडले. ते म्हणाले की, 'एकोणिसाव्या शतकात महिलांनी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात प्रवेश केल्यानंतर त्यांची आत्मजाणीव जागृत होण्यास सुरुवात झाली, परंतु राजकीय क्षेत्रातील पुरुषांचा प्रभाव अधिक असल्याने त्यावेळी काही ठिकाणी महिलांना दुय्यम स्थान दिले जात होते. परंतु स्त्री-पुरुष समानता पूर्णत्वाला नेण्यासाठी सर्वात प्रथम श्रमाची विभागणी ही समान होणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ पालन-पोषण ही संज्ञा केवळ स्त्रियांशीच नव्हे तर पुरुषांशी देखील तितकीच निगडित आहे. त्यामुळेच पुरुषांप्रमाणेच स्त्रियांना देखील प्रत्येक राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रात समान हक्क आणि संधी मिळाव्यात यासाठी चर्चा होणे गरजेचे आहे' असे त्यांनी सांगितले.

यानंतर कार्यक्रमाच्या बीजभाषण वक्त्या डॉ. विभूती पटेल यांनी आपल्या भाषणात 'स्थानिक, राष्ट्रीय आणि प्रादेशिक, तसेच जागतिक स्तरावर निर्णय प्रक्रियेत प्रभावी भूमिका आणि धोरण निश्चित करण्यासाठी महिलांना मतदार, उमेदवार, निवडून आलेले प्रतिनिधी या नात्याने सक्रिय राजकीय सहभागासाठी समान खेळाचे क्षेत्र असणे आवश्यक आहे, तसेच महिलांमध्ये नेतृत्व गुण विकसित करणे आणि त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी त्यांना सक्षम करणे गरजेचे आहे' असे

सांगितले. यानंतर त्यांनी आजच्या काळातील महिलांचा विविध क्षेत्रात जागतिक पातळीवर असणारा सहभाग आणि आतापर्यंत स्त्रियांचा झालेला सर्वांगीण विकास यावर भाष्य केले.

परिषदेच्या पुढील सत्रास ज्येष्ठ पत्रकार आणि लेखिका गौरी द्विवेदी, तसेच मुंबई विद्यापीठातील मानव्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजेश खरात हे अतिथी वक्ते म्हणून लाभले होते. गौरी द्विवेदी यांनी, 'जागतिक पातळीवरील स्त्रियांचे नेतृत्व, यावर भाष्य केले. आपल्या भाषणात त्या म्हणाल्या की, भारतच नव्हे तर जगातील इतर देशांमध्ये देखील स्त्रियांचे जागतिक पातळीवर नेतृत्व हे अतिशय कमी प्रमाणात दिसून येते. गेल्या अनेक वर्षांपासून आकडेवारी लक्षात घेता केवळ हाताच्या बोटांवर मोजता येतील इतक्याच स्त्रिया जागतिक पातळीवर नेतृत्वाची भूमिका बजावू शकल्या आहेत, ही संपूर्ण परिस्थिती लक्षात घेता पुढील शंभर वर्षात तरी स्त्री-पुरुष समानतेची चर्चा पूर्णत्वाकडे जाणार नाही असे त्या म्हणाल्या. भारतासारख्या इतर विकसनशील, तसेच विकसित देशांमध्ये देखील स्त्रियांचा राजकीय सहभाग हा अजूनही क्वचितच दिसून येतो. त्यामुळे यात सुधारणा करण्यासाठी आपण छोटी छोटी पावले उचलत आपल्या यशाच्या मार्गाने मार्गक्रमण करण्यास सुरुवात केली पाहिजे आणि त्यासाठी जागतिक स्तरावर चर्चा होणे गरजेचे आहे असे देखील त्यांनी सांगितले.

मान्यवर वक्त्यांच्या परिसंवादासाठी श्री. भीम रासकर - महिला राजसत्ता आंदोलन, डॉ. शुभा राऊळ- मुंबईच्या माजी महापौर, ॲड. माधवी नाईक - उप अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश - भाजपा, कु. कल्पना महाले - सरपंच, शिरसगाव या अनुभवी मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली.

या परिचर्चेत सर्व मान्यवरांनी स्त्रियांचा राजकीय क्षेत्रातील प्रभाव आणि कामगिरी याबद्दल आपले मत प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून मांडणे, त्याचबरोबर स्त्रियांना विविध क्षेत्रांत आपल्या हक्कासाठी, तसेच संधी प्राप्त करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षाबद्दल चर्चा केली.

कार्यक्रमाचा समारोप सत्रासाठी महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे या प्रमुख वक्त्या म्हणून लाभल्या. यावेळी त्यांनी 'स्त्रियांचे जागतिक ते स्थानिक पातळीवरील नेतृत्व : आव्हाने आणि संधी' याबद्दल थोडक्यात आपले मत मांडले. त्या म्हणाल्या की 'आपल्या देशात महिलांची बरीच शक्ती ही लोकांचा दृष्टिकोन समजून घेण्यात जाते. बऱ्याच वेळा स्त्रियांना महत्त्वाचे निर्णय घेताना दुय्यम लेखले जाते; परंतु स्त्री ही वैयक्तिक तसेच सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात देखील तितक्याच प्रभावीपणे कार्य करू शकते. कारण स्त्री ही अतिशय सहनशील आणि बहुकार्यक्षम आहे. अलीकडच्या काळात स्त्रिया एकाचवेळी अनेक ठिकाणी सक्रियपणे कार्य करत असतात; परंतु अजूनही ग्रामीण भाग अनेक सोयी-सुविधांपासून वंचित राहिले आहेत' त्यामुळे समाजाने स्त्रियांसाठी निर्माण केलेला दृष्टिकोन बदलून स्त्रियांना त्यांचे हक्क आणि राजकीय, तसेच सामाजिक क्षेत्रात संधी प्राप्त व्हावी यासाठी चर्चा होणे गरजेचे आहे असे त्या म्हणाल्या. न्यू झीलंडच्या राष्ट्राध्यक्षा जेसिंडा आर्डर्न यांचा उल्लेख करत स्कँडिनेव्हियन देशांमध्ये महिलांनी पर्यावरणावर विशेष लक्ष दिले आहे असे त्या म्हणाल्या. जगाच्या शाश्वत विकासासाठी महिलांचे सक्षमीकरण होणे अत्यावश्यक आहे. २०३० दशक हे कृती दशक असून, 'स्त्रियांच्या सर्वांगीण विकासाचे दूत व्हा' असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीतर्फे देवेंद्र पै यांनी उपस्थितांचे आभार मानले. महाविद्यालयाच्या वतीने उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर यांनी सर्वांचे आभार मानले आणि पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. भारतातील विभिन्न राज्यांमधून ३७ शोधनिबंध

प्राप्त झाले, असून बहुसंख्य विद्यार्थी, प्राध्यापक व संशोधकांनी या परिषदेत सहभाग नोंदवला. विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम संपन्न झाला. जिज्ञासूंसाठी परिषदेतील सर्व व्याख्याने महाविद्यालयाच्या यू ट्युब चैनल वर उपलब्ध करण्यात आलेली आहेत.

**जिल्हास्तरीय राष्ट्रीय मतदार दिवस जनजागृती अभियान**



राष्ट्रीय मतदार दिवसाचं औचित्य साधून, दिनांक २५ जानेवारी २०२२ रोजी, विद्या प्रसारक मंडळ संचालित के. ग. जोशी कला महाविद्यालय ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त) ठाणे, सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल स्थानिक जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय राष्ट्रीय मतदार जनजागृती अभियान - २०२२ हे झूम आणि यू ट्युब ह्या आभासी माध्यमाद्वारे ठीक सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आले. नाव मतदारांना मतदार यादीत नावनोंदणीसाठी प्रोत्साहित करणे, नावनोंदणी करून घेणे, सुजाण व जबाबदार नागरिक घडविण्यासाठी ह्या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे.

सदर कार्यक्रमास डॉ. संजय जगताप - सहसंचालक, उच्च शिक्षण कोकण विभाग, पनवेल, श्रीमती ज्ञानदा कदम - प्रशासन अधिकारी, डॉ. सोनाली रोडे - विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, मुंबई, श्री. युवराज बांगर - तहसीलदार, ठाणे, श्री. विजू माने - सुप्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक, ह्या मान्यवरांनी आभासी, तसेच प्रत्यक्ष स्वरूपात हजर राहून कार्यक्रमास उपस्थिती दर्शवली. ह्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जोशी - बेडेकर (स्वायत्त) महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक यांनी भूषवले.

मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करताना, प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक यांनी महिलांच्या मतदानाच्या हक्कांवर भाष्य केले. तसेच, मतदान करून भारतीय लोकशाही बळकट करावी अशी इच्छा व्यक्त केली. डॉ. संजय जगताप यांनी युवक मतदारांनी मतदान यादीत आपले नाव नोंदवून घेऊन लोकसहभाग वाढवावा असा मोलाचा सल्ला दिला. श्रीमती ज्ञानदा कदम यांनी चुकीच्या व्यक्तीला मतदान म्हणजे भ्रष्ट कारभाराला खत-पाणी असे आपले मत व्यक्त केले. डॉ. सोनाली रोडे यांनी देखील मतदानाचे महत्त्व पटवून दिले. श्री. युगराज बांगर यांनी मतदारांना जागरूक राहण्याचे आवाहन केले.

प्रमुख अतिथी श्री. विजू माने यांनी आपलं अमूल्य मत हे वाया घालवू नये व निर्भीडपणे आपल्या हक्कांचा वापर करून युवकांनी लोकशाही बळकट करावी असे विचार मांडले. श्री. विजू माने यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं योगदान किती अफाट आहे आणि त्याचा भारतीयांना गर्व असावा असेही आपले मत ठामपणे मांडले.

कार्यक्रमाच्या शेवटी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी 'मतदार जनजागृती' ह्या विषयावर पथनाट्य सादर केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यामागे उप-प्राचार्य डॉ. महेश पाटील, सहायक प्राध्यापक श्री. स्वप्नील मयेकर, डॉ. विनोद चांदवाणी, श्री. सुदाम अहिरराव, तांत्रिक बाजू सांभाळणारे श्री. महेश दुधभाते, वि.प्र.म.चे, तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमात राष्ट्रगीत आणि पसायदान तृतीय वर्ष तत्त्वज्ञानाची विद्यार्थिनी प्राजक्ता शेंद्रे हिने सादर केले व कार्यक्रमाचं

संपूर्ण सुत्रसंचलन प्रा. वेदवती परांजपे यांनी केले. उपप्राचार्य सुभाष शिंदे, डॉ. प्रियंवदा टोकेकर, ग्रंथपाल नारायण बारसे यांचे सहकार्य या कार्यक्रमासाठी लाभले.

**भगवद्गीत पठण स्पर्धेचे आयोजन**



जोशी बेडेकर कला वाणिज्य स्वायत्त महाविद्यालय, संस्कृत विभाग, प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाने दि. १९/१/२२ रोजी भगवद्गीत पठण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यातील विजेत्या स्पर्धकांना मानचिह्न व पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम दि. ४/२/२२ ला उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर यांच्या हस्ते संपन्न झाला. विभागातर्फे सर्व मान्यवरांचे अनेकानेक धन्यवाद.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

**२०२१ – २०२२ चे प्रथम वर्ष विधीची प्रवेश प्रक्रिया**

२०२१ – २०२२ चे प्रथम वर्ष विधीची प्रवेश प्रक्रिया (पहिली फेरी) ३१ डिसेंबर, २०२१ ते ५ जानेवारी, २०२२ या तारखांमध्ये झाली. CET सेल द्वारे वाटप केलेल्या २५२ जागांपैकी १५५ जागा प्रथम फेरीत भरण्यात आल्या.

**नवीन भारती**

विद्या प्रसारक मंडळाचे विद्यमान अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी पूर्णवेळ प्राध्यापक म्हणून नियुक्त केलेल्या सौ. रश्मी रोहित नाटेकर, (B.Sc., LL.M., PGDFM, CAIIB) या १ जानेवारी, २०२२ पासून महाविद्यालयामध्ये रुजू झाल्या. सौ. रश्मी नाटेकर ह्या महाराष्ट्र सेट (MH-SET) ही परीक्षा उत्तीर्ण झाल्या आहेत आणि प्राध्यापक पदासाठी त्यांना अहर्ता प्राप्त झाली आहे. मिस. माझनीन खातीब आणि मिस. कोमल गोपाळ सिंन्हा ह्यांची अनुक्रमे IPR आणि Labour Laws ह्या विषयांसाठी तासिका तत्त्वावर प्राध्यापक म्हणून महाविद्यालयात नेमणूक करण्यात आली आहे.

**२०२१ च्या दुसऱ्या सत्रातील परीक्षा**

विद्यापीठाच्या २०२१ च्या दुसऱ्या सत्रातील परीक्षा डिसेंबर महिन्यात घेण्यात आल्या. ज्या विद्यार्थ्यांना आभासी पद्धतीने परीक्षा देण्यात तांत्रिक अडचणी आल्या त्या विद्यार्थ्यांच्या अतिरिक्त परीक्षा जानेवारी महिन्यात घेण्यात आल्या.

**ॲड ऑन प्रमाणपत्र कार्यक्रम**

ॲड ऑन प्रमाणपत्र अभ्यासक्रम सप्टेंबर, २०२१ ते डिसेंबर, २०२१ ह्या कालावधीमध्ये घेण्यात आला.

१) प्राणी संरक्षण कायदे

२) माध्यमं आणि कायदे

३) निवडणुकीचे कायदे

एकतीस विद्यार्थ्यांची नोंदणी करून पहिला वर्ग यशस्वीरित्या पूर्ण झाला. ह्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे निकाल ३ जानेवारी, २०२२ रोजी घोषित करण्यात आले आणि विध्यार्थ्यांना प्रमाणपत्र त्यांच्या निवासी पत्यावर रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आले.

ह्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्गाची घोषणा करण्यात आली असून, संपूर्ण देशातून एकूण ५० विद्यार्थ्यांनी प्रवेश नोंदवला आहे. हा अभ्यासक्रम १८ फेब्रुवारी, २०२२ पासून सुरू करण्याचे योजिले आहे.

**२०२१ – २०२२ चे दुसऱ्या सत्रातील शिकवणीची सुरुवात खालील प्रमाणे**

द्वितीय वर्ष – १० जानेवरी, २०२२

तृतीय वर्ष – ७ जानेवरी, २०२२

प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेतील विलंबामुळे आणि दोनच तुकड्यांचे प्रवेश पूर्ण झाल्यामुळे, ह्या दोन तुकड्यांची शिकवणी २४ जानेवरी, २०२२ ला सुरू करण्यात आली.

**ठाणे विधी महाविद्यालयाचे क्लस्टर आणि निकाल**

क्लस्टर बैठक ७ जानेवारी, २०२२ रोजी घेण्यात आली, ज्यामध्ये डिसेंबरमध्ये घेण्यात आलेल्या एल. एल. बी. परीक्षेसाठी ग्रेस गुण देण्याचे ठरवण्यात आले. विद्यापीठाच्या निर्देशानुसार द्वितीय आणि चौथ्या सत्राचे निकाल सर्व विधी महाविद्यालयांद्वारे २१ जानेवारी, २०२२ रोजी घोषित करण्यात आले.

**केइएस श्री. जयंतीलाल एच. पटेल विधी महाविद्यालय**

१. केइएस श्री. जयंतीलाल एच पटेल विधी महाविद्यालयाने चित्रपट स्क्रीनिंगवर आधारित बाह्य स्पर्धा आयोजित केली होती. आमचे विद्यार्थी श्री. अभिनंदन सावंत (द्वितीय वर्ष विधी) याने द्वितीय पारितोषिक पटकावले आहे.

२. केइएस श्री जयंतीलाल एच पटेल विधी महाविद्यालय ऑनलाइन फेस्ट. आमच्या विधी महाविद्यालयाचा विद्यार्थी श्री. रोहित घोडके याने पोस्टर मेकिंग स्पर्धेत प्रथम पारितोषिक पटकावले आहे.

**२६ जानेवरी, २०२२ – प्रजासत्ताक दिन**

सकाळी आठ वाजता विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर ह्यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकविण्यात आला. या वेळेस विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व संस्थांचे प्रमुख उपस्थित होते. एन.सी.सी. आणि एन.एस.एस. परेड झाल्या. तसेच पुरस्कार प्रदान सोहळा पार पडला. सर्व विद्यार्थी आणि कर्मचारी वर्ग कार्यक्रमास आभासी पद्धतीने उपस्थित होते.

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा**

दिनांक २३, जानेवारी, २०२२ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा घेण्यात आल्या व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी पर्यवेक्षणाची जबाबदारी पार पाडली.

**बार कौन्सिल ऑफ इंडिया (BCI)**

प्रवेश शुल्क संदर्भातील एप्रिल २०१९ पासून प्रदीर्घ प्रलंबित असलेला विषय याचा बार कौन्सिल ऑफ इंडियाकडे पाठपुरावा करण्यात आला. बार कौन्सिल ऑफ इंडियाने अभ्यासक्रम, प्रती विषयाची शिकवणी, अध्यापक इ. या संदर्भातील माहिती मागितली जी १४ जानेवारी २०२२ ला स्पीड पोस्टाने पाठवली. या विषयात बार कौन्सिल ऑफ इंडियाकडे सतत पाठपुरावा चालू आहे.

**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा**

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने महाविद्यालयाने अनेक स्पर्धा व व्याख्यांनाचे आयोजन केले होते. महाविद्यालयामध्ये असलेले मराठी वाङ्मय मंडळ व विधी साहाय्य कक्ष यांच्या माध्यमातून हे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

**स्पर्धा**

**१) मराठी भाषांतर स्पर्धा : २१ जानेवारी २०२२**

स्वीस रिबबोन्स विरुद्ध भारत सरकार या सर्वोच्च न्यायनिवाड्यातील दोन उताऱ्यांचे भाषांतर विद्यार्थ्यांना करावयाचे होते. यासाठी एकूण ३० मिनिटांचा अवधी देण्यात आला होता. या स्पर्धेसाठी परीक्षण प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी केले. यामधील विजेते खालील प्रमाणे आहेत.

प्रथम : जग्गनाथ कुलकर्णी (तृतीय विधी)

द्वितीय : दीपक कामटीकर (प्रथम विधी)

तृतीय : प्रज्ञा जक्कलवार (द्वितीय विधी)

उत्तेजनार्थ : अभिनंदन सावंत (द्वितीय विधी)

**२) राष्ट्रीय बालिका दिवसाच्यानिमित्त वक्तृत्व स्पर्धा**

२४ जानेवारी हा राष्ट्रीय बालिका दिवस म्हणून साजरा केला जातो. त्या निमित्ताने विद्या प्रसारक मंडळाच्या टी एम सी विधी महाविद्यालयाने एका अनोख्या व आकर्षक अशा विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. 'अभिमान आहे मला मुलगी असल्याचा' हा तो विषय होता. संध्याकाळी ६.०० वाजता गुगल मीट या मंचावर ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये परीक्षक म्हणून अधिवक्ता विद्या गायकवाड होत्या. अनेक विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदविला. या मध्ये खालीलपैकी बक्षिसे देण्यात आले.

प्रथम : विनायक शिवगण (द्वितीय विधी)

द्वितीय : श्वेता भालेराव आणि आम्रपाली काकडे (द्वितीय विधी)

तृतीय : स्मिता वैद्य (प्रथम विधी)

**३) कथाकथन स्पर्धा**

दिनांक २५ जानेवारी २०२२ रोजी गुगल मीट या मंचावरून कथाकथन या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. मेधा ढापरे, राज्यशात्र विभाग प्रमुख, कीर्ती डुंगुरसी महाविद्यालय, दादर या सदर स्पर्धेच्या परीक्षक होत्या. स्वतःच्या किंवा आवडत्या लेखकाच्या कथेचे कथन करण्याची परवानगी या स्पर्धेसाठी देण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विजेते खालील प्रमाणे आहेत.

प्रथम : स्मिता वैद्य (प्रथम विधी)

द्वितीय : शुभांगी निश्चित (तृतीय विधी)

तृतीय : श्वेता भालेराव (द्वितीय विधी)

उत्तेजनार्थ : दीपा ठोसर (प्रथम विधी)

**४) न्यायनिवाड्यावरील भाष्य स्पर्धा**

२६ जानेवारी २०२२ रोजी न्यायनिवाड्यावरील भाष्य स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिवाड्यावर मराठीमध्ये भाष्य करून, त्याची रेकॉर्डिंग करून पाठवायची होती. यामध्ये परीक्षक म्हणून प्राध्यापिका युतीका सावंत होत्या. विजेते खालीलप्रमाणे आहेत.

प्रथम : प्रभाष भोयार (द्वितीय विधी)

द्वितीय : भाग्यश्री चव्हाण (द्वितीय विधी)

तृतीय : जग्गनाथ कुलकर्णी (तृतीय विधी)

**५) अभिरूप न्यायालय स्पर्धा**

२७ जानेवारी २०२२ रोजी मराठी अभिरूप न्यायालय स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ग्राहक तक्रारी संबधी असलेल्या केसवर विद्यार्थ्यांना बाजू मांडायची होती. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून अधिवक्ता श्री. गणेश नलावडे, ठाणे सत्र न्यायालय हे होते. विजेते खालीलप्रमाणे आहेत.

प्रथम : भाग्यश्री चव्हाण (द्वितीय विधी)

द्वितीय : आम्रपाली काकडे (द्वितीय विधी)

तृतीय : प्रमोद बोडके (द्वितीय विधी)

---

यश साजरा करणे चांगले आहे, परंतु आपल्या अपयशापासून शिकणे महत्त्वाचे आहे.

**६) मराठी गीत गायन स्पर्धा – २८ जानेवारी, २०२२**

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त मराठी गीत गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना मराठीतील सर्व प्रकारची गीते गाण्याची मुभा देण्यात आली होती. विद्यार्थ्यांनीही यावेळी त्यांच्या कलागुणांचे सादरीकरण केले. गुगल मिटच्या माध्यमातून ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार, प्रा. विनोद एच वाघ, प्रा. रश्मी नाटेकर यांनी काम पाहिले. यातील विजेते खालीलप्रमाणे आहेत.

प्रथम : जग्गनाथ कुलकर्णी (तृतीय विधी)

द्वितीय : श्वेता भालेराव (द्वितीय विधी)

तृतीय : भगवान पाटील (तृतीय विधी)

उत्तेजनार्थ : साक्षी कुमावत (प्रथम विधी) आणि
वर्षा लिखिते (तृतीय विधी)

**व्याख्यानं**

**१) न्यायालयाची भाषा मराठी भाषा – २२ जानेवारी, २०२२**

श्री. किशोर चौधरी, दिवाणी न्यायाधीश आणि प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे 'न्यायालयाची भाषा मराठी भाषा' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. गुगल मीट या मंचावर याचे आयोजन झाले होते. यावेळी श्री. चौधरी यांनी न्यायालय कशाप्रकारे मराठी भाषेतून काम करते आणि विद्यार्थ्यांनी, वकिलांनी काय अभ्यास करावा म्हणजे मराठी भाषेतून मसुदा तयार करणे किंवा वाद-विवाद करणे अधिक सोईस्कर होऊ शकते. यावेळी प्रभारी प्राचार्या, सर्व प्राध्यापक, विद्यार्थी वर्ग हजर होता.

**२) प्रवास वर्णन लिहिण्याची कला–२३ जानेवारी, २०२२**

विद्या प्रसारक मंडळाचे बांदोडकर विज्ञान महाविद्यालयचे प्राध्यापक आणि कॅप्टन बिपीन धुमाळे यांचे प्रवास वर्णन लिहिण्याची कला या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अनेक प्रकारचे प्रवास वर्णन व ते लिहिण्याची कला, लक्षात ठेवण्याजोग्या घटना, टाळण्याजोग्या गोष्टी, आकर्षक शब्द अशा सगळ्यांविषयी यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी प्रभारी प्राचार्या, सर्व प्राध्यापक, विद्यार्थी वर्ग हजर होता.

**३) राष्ट्रीय मतदार दिवस – २५ जानेवारी, २०२२**


२५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयाच्या माध्यमातून मतदार जागृती अभियानाचा भाग म्हणून प्रभारी प्राचार्या श्रीमती डॉ. श्रीविद्या जयकुमार यांचे व्याख्यान गुगल मीट या मंचावर आयोजित करण्यात आले होते. यावेळी त्यांनी भारतीय संविधान, निवडणूक आयोग व इतर कायद्याच्या माध्यमातून कशाप्रकारे मतदानाचा अधिकार सुनिश्चित करण्यात आला आहे याची माहिती दिली.

**४) कवितेच्या वाटेवर – २६ जानेवारी, २०२२**

डॉ. बेडेकर विद्या मंदिराच्या शिक्षिका श्रीमती. साधना जोशी यांचा 'कवितेच्या वाटेवर' हा कार्यक्रम दिनांक २६ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता गुगल मीट या मंचावर आयोजित करण्यात आला होता. यावेळी जोशी यांनी अनेक प्रकारच्या कवितांचे प्रकार सांगितले. बडबड गीतापासून, शालेय कविता, ज्ञानवर्धक कविता, विडंबन कविता, ओव्या अशा प्रकारच्या कवितेचे प्रकार सांगून त्या कविता गाऊन दाखवल्या. अनेक नामवंत कवींचाही यावेळी उल्लेख करण्यात आला. या कार्यक्रमासाठी विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या माजी प्राचार्या व विद्या प्रसारक मंडळाच्या ॲडव्हान्स स्टडी केंद्राच्या प्रमुख डॉ. माधुरी पेजावर, बेडेकर विद्यामंदिरच्या मुख्याध्यपिका वंदना सुरवाडे, विधी महाविद्यालयाच्या

'आयुष्यात तुम्ही कितीही शिकलात, पैसा आणि नाव कितीही कमवलंत तरीही आई, वडील, गुरू यांच्या आशीर्वादाशिवाय सर्वकाही व्यर्थ असतं.


प्रभारी प्राचार्या श्रीमती डॉ. श्रीविद्या जयकुमार, प्राध्यापक वर्ग, कर्मचारी यावेळी उपस्थित होते. सूत्र संचालन व पाहुण्यांची ओळख प्रा. विनोद एच. वाघ यांनी केली. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी सर्वांचे स्वागत केले. प्रा. रश्मी नाटेकर यांनी आभार प्रदर्शन केले.




**५) मराठी भाषा आणि तरुणाईची भूमिका – २८ जानेवारी, २०२२**

श्री. स्वानंद गांगल यानी 'मराठी भाषा आणि तरुणाईची भूमिका' या विषयावर आपले विचार मांडले. गुगल मिटच्या मंचावर ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्वातंत्रवीर वि. दा. सावरकर यांनी मराठी भाषेला बरेच शब्द दिले. जसे की दिग्दर्शन, महानगर पालिका इ. देऊन मराठी भाषेला समृद्ध केले आहे असे ते म्हणाले. मराठी भाषेचा वापर रोजच्या जीवनात सगळ्यांनी करायलाच हवा हे त्यांनी आग्रहाने मांडले.

सूत्र संचालन व पाहुण्यांची ओळख प्रा. विनोद एच वाघ यांनी केली. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी सर्वांचे स्वागत केले. ग्रंथपाल शीतल सोनावणे यांनी आभार प्रदर्शन केले.



**IQAC आणि कॉलेज डेव्हलपमेंट कमिटीची बैठक**

८ वी IQAC यांची बैठक दिनांक २९ जानेवारी, २०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजता घेण्यात आली.

८ वी कॉलेज डेव्हलपमेंट कमिटी यांची बैठक दिनांक २९ जानेवारी, २०२२ रोजी सायंकाळी ६.३० वाजता घेण्यात आली. यावेळी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक घेण्यात आली. मागील बैठकीचा वृत्तांत वाचण्यात आला आणि बैठकीच्या अजेंड्यावर चर्चा करण्यात आली. आदरणीय संस्थापक आणि नामनिर्देशित सदस्यांचे मन:पूर्वक आभार.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

**१) कॉम्प्युटर इंजिनिअरींग विभाग :**

सौ. गौतमी पुजारे (व्याख्यात्या कॉम्प्युटर इंजिनिअरींग विभाग)

अ) सरदार पटेल इन्स्टिटट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (S.P.I.T.) मुंबई व AICTE (New Delhi) यांच्या संयुक्त विद्यमाने (३ जानेवारी ते ७ जानेवारी २०२२) – "ATAL FDP Design Thinking : Practical Perspective on Decision Making Education" या विषयावर आयोजित केलेल्या कार्यक्रमाला त्यांचा सहभाग होता.

ब) "Testbook Skilled Campus Program" यांनी आयोजित केलेल्या (२२ जानेवारी २०२२) Workshop on Right Strategy to reach out to Recruiters आणि "Testbook Skilled campus program" (२९ जानेवारी २०२२) How to Bridge the Gap Between Student Skillset and Industry Requirements या कार्यशाळेत त्यांचा सहभाग होता.

**अतिथी व्याख्यान : (विद्यार्थ्यांसाठी)**

१) Boot-Camp on "Business Analytics" (Skilled Academy Campus Program यांनी आयोजित केलेल्या) केलेल्या कार्यक्रमाला कॉम्प्युटर इंजिनिअरींग

विभागाच्या १२० विद्यार्थ्यांनी (२९ जानेवारी २०२२) श्री. कृष्णायु भट्टाचारजी यांच्या व्याख्यानाचा लाभ घेतला.

२) "Live Boot-Camp on "How to Develop Soft Skills" Skilled Academy Campus Program यांनी आयोजित केलेली (२२ जानेवारी २०२२) च्या कार्यक्रमाला दीक्षा अग्रवाल यांच्या व्याख्यानाला १०० विद्यार्थी उपस्थित होते.

३) Live Aptitude Test by Skilled Academy Campus Program या १४ ते १६ जानेवारी २०२२ ला आयोजित झालेल्या कार्यक्रमाला ७५ विद्यार्थी उपस्थित होते.

**विद्यार्थ्यांचे यश**

१) "Idea Pitching Competition" मध्ये आर्यन राजे, निमिषा घरत, आर्या राजे, चैताली गायकवाड यांना द्वितीय पारितोषिक मिळाले. सदर कार्यक्रम विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनात सादर झाला.

२) "Idea Pitching Competition" मध्ये शिवानी बोडके या विद्यार्थिनीचा सहभाग होता.

**इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स विभाग**

**विद्यार्थ्यांचा उपक्रम**

१) "IIC National Innovation Contest 2020" हा मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन इन्व्होवेशन सेल (नवीन दिल्ली) यांच्यातर्फे आयोजित केलेल्या "Innovation / Star Up" या अंतर्गत श्रीयश केळकर, यश बारी, प्रणित केरकर व पंकज गोडसे यांनी श्री. सुनिल नागरे (प्राध्यापक) यांच्या मार्गदर्शनाने "Third Eye of Blind using arduino and ultrasonic sensors" या प्रकल्पाला प्रशंसा प्रमाणपत्र मिळाले.





२) "Indea Pitching Competition" या IICUC विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन यांनी विद्यार्थ्यांमध्ये नावीन्यता जागृत करण्यासाठी आयोजित केलेल्या स्पर्धेत १० डिसेंबर २०२१ तृतीय वर्षाचा साई दामोदर या विद्यार्थ्याला "Affordable NAS Database using Raspberry pi +" या कल्पनेला सर्वप्रथम पारितोषिक मिळाले व कु. दळवी अझका फैझ हिला "Creating new handmade paper from waste paper" या कल्पनेला तृतीय पारितोषिक मिळाले.




३) "ISTE Chapter Thakur Polytechnic" यांनी आयोजित केलेल्या "State level General Quiz Competition 2021" या स्पर्धेत (१६ डिसेंबर २०२१) रोजी आयोजित केलेल्या साई दामोदर या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्याला "Runner up" पारितोषिक मिळाले.




४) "Circuit design competition with Tinker Cad" या स्पर्धेचे आयोजन इलेक्ट्रॉनिक्स, इन्स्ट्रयेमेन्टेशन व इलेक्ट्रीकल विभागाच्या विद्यार्थ्यांनी केले. या स्पर्धेसाठी दि. २१ डिसेंबर २०२१ रोजी आयोजित केलेल्या कार्यशाळेत डॉ. निनाद मेहेंदळे (इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स विभागाचा माजी विद्यार्थी) व Associate Professor के. जे. सोमय्या इंजिनिअरींग कॉलेज यांनी कार्यशाळेला मार्गदर्शन केले. प्राध्यापक डॉ. रवींद्र डुचे (विभाग प्रमुख EXTC विभाग लोकमान्य टिळक कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग) यांनी स्पर्धेचे परीक्षक म्हणून कार्य सांभाळले.




५) विद्यार्थ्यांमधील कला व संगीतातील प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी "Online Karaoke Singing Competition" तंत्रनिकेतनातील सर्व विद्यार्थ्यांसाठी आयोजित केले (३० डिसेंबर २०२१) २९ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला. श्री. सिद्धेश तालोकर (Deputy Manager in NMQ Reliance, JIO, Mumbai व तंत्रनिकेतनतला माजी विद्यार्थी) व श्री. निखील सारवांडीकर (Data Science expert, cognizent Technology Solution Pvt. Ltd.) परीक्षक लाभले.



६) **"Industry Visit unde MoU"**

द्वितीय व तृतीय वर्षांच्या विद्यार्थ्यांची "Ashida Electronics Pvt. Ltd., Thane" मध्ये २९ डिसेंबर २०२१ रोजी Industry Visit आयोजित केली.



७) **"Faculty Development Programmes"**

१) डॉ. कीर्ती आगाशे व सौ. अमिशा भोईर यांनी २३ ते २५ डिसेंबर २०२१ रोजी K. E. Society's Rajarambapu Institute of Technology राजारामनगर व MSBTE यांनी आयोजित केलेल्या "Electric Vehicles" या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली.



२) श्री. सुनील नागरे यांनी "Perspective on Decision Making Education" या विषयांतर्गत आयोजित केलेल्या (३ ते ७ जानेवारी २०२२) केलेल्या AICTE Training and Learning (ATAL) व भारतीय विद्यापीठ भवन यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली.

३) डॉ. कीर्ती आगाशे व सौ. अमिषा भोईर यांनी "Recent Trends of Robotics and Automation" या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली. सदर कार्यक्रम ५ ते ११ जानेवारी २०२२ SKIT, जयपूर, राजस्थान AICTE-ISTE यांनी आयोजित केला.

८) डॉ. कीर्ती आगाशे, श्री. तुषार मोहित-पाटील, सौ. अमिषा भोईर, श्री. सुनील नागरे व निकिता महाजन यांनी २२/१/२०२२ भारतीय विद्या भवनस. SPIT व US Institute of 3D Technology, California, US यांनी आयोजित केलेल्या "Introduction to 3D Printing Technology" या कार्यशाळेला उपस्थित होते.

९) दिनांक ९ जानेवारी २०२२ रोजी डॉ. कीर्ती आगाशे यांनी प्रख्यात कार्यक्रम ''रामभाऊ म्हाळगी व्याख्यानमाला'' या व्याख्यानमालेत आयोजित केलेल्या सत्रात त्यांनी प्रसिद्ध लेखक व पौराणिक कथेचे लेखक डॉ. देवदत्ता पट्नाईक यांच्या ''कृष्ण ब्रह्मांड रूप'' यावर भाषण केले.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे


**जानेवारी २०२२ मधील कार्यक्रम / वार्ता**

४ जानेवारी : पीजीडीएम वित्त शाखेचे ४ विद्यार्थी आणि एमएमएस वित्त शाखेतील एका विद्यार्थ्याची, मुख्य वित्त कारभार पार्श्वरेखा असलेल्या 'क्रेडिट मॅनेजर' पदाच्या रु. ३.५ लाखाच्या वार्षिक पगारासह 'कोटक महिंद्रा बँक' मध्ये निवड झाली. सहाय्यक प्रा. सिद्धेश सोमण यांच्या सहकार्याने रोजगार नियुक्ती विभागाच्या स्वेता नायर यांनी यासाठी समन्वय साधला.

kotak
Kotak Mahindra Bank

५ जानेवारी : डॉ. स्मिता जपे यांनी 'महिला विकास समिती'च्या वतीने स्वयंसेवी संस्था श्रीशक्तीच्या सदस्या अंजली भालेराव यांच्या सोबत ऑनलाइन बैठकीचे आयोजन केले.


६ जानेवारी : प्रा. कृणाल के. पुंजानी यांनी ब्रिम्सच्या आय आय सी समितीच्या वतीने डॉ. सुधाकर आगरकर आणि डॉ. नीतिन जोशी यांचे 'वातानुकूलित प्रक्रियेचा वैज्ञानिक शोध' या विषयावर एक वेबिनारचे आयोजन केले.






८ ते ९ जानेवारी : डॉ. नीतिन जोशी यांनी इंडोव्हन्स पुणेसाठी 'सर्व्हिसेस ऑपरेशन्स मॅनेजमेंट' या विषयावर ऑनलाइन कार्यक्रम आयोजित केला.

१२ ते १४ जानेवारी : आय क्यू ए सी सदस्य डॉ. पल्लवी, डॉ. स्मिता जपे, डॉ. मीनाक्षी, आय क्यू ए सी गट (क्लस्टर) इंडिया द्वारे आयोजित 'AQAR 2020-21 फाइलिंगसाठी प्रश्न सोडवण्याचे ३ दिवसीय सत्राला' उपस्थित राहिल्या.




१२ जानेवारी:  डॉ. नीतिन जोशी यांना बाबासाहेब गावडे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या एलआयसी भेटीसाठी तज्ज्ञ म्हणून नामांकन मिळाले.


१३ जानेवारी : प्रा. कुणाल के. पुंजानी यांना एशियन जर्नल ऑफ मॅनेजमेंट केसेस - स्कोपस आणि एबीडीसी सूचीबद्ध जर्नल द्वारे समीक्षक म्हणून आमंत्रित केले गेले आणि त्यांनी समीक्षा कार्य यशस्वीरित्या पूर्ण केले.

१५ जानेवारी: विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज येथे मुलाखती घेण्यासाठी मुंबई विद्यापीठा (UoM) द्वारे डॉ. नीतिन जोशी यांना विषय तज्ज्ञ म्हणून नामांकन मिळाले.

२० जानेवारी : डॉ. नीतिन जोशी आणि डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी व्हीपीएमच्या बी.एन. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमांच्या बोर्ड ऑफ स्टडीजच्या बैठकीत भाग घेतला.

२४ जानेवारी : डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी  एन बी ए मार्गदर्शनासाठी, एन बी ए मार्गदर्शक बैठकीचे आयोजन केले, या वेळी डॉ. पल्लवी, डॉ. जपे, डॉ. नंदूरकर, डॉ. मीनाक्षी, प्रा. महेश, प्रा. विभूती यांनी निकषनिहाय स्थिती सादरीकरण केले.







२७ जानेवारी : डॉ. नीतिन जोशी यांनी व्हीआयटी वडाळा या संस्थेला भेट दिली.


२८ जानेवारी : ब्रिम्स आय आय सी समितीच्या वतीने प्रा. कुणाल के. पुंजानी यांनी ''डिझाइन थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग अँड इनोव्हेशन डिझाईन'' या विषयावर सुश्री पुनम जैन - प्रमाणित डिझाइन थिंकिंग प्रॅक्टिशनर आणि लर्निंग अँड डेव्हलपमेंट सल्लागार यांच्या कार्यशाळेचे आयोजन केले.





२९ जानेवारी : डॉ. पंकज नंदूरकर आणि प्रा. कुणाल के. पुंजानी यांनी ब्रिम्सच्या आय आय सी आणि एस डी सी समितीच्या वतीने, पुण्याच्या पीआयबीएमचे अधिष्ठाता प्रा. बिभास बी यांच्या ''अध्यापन-शिक्षण प्रक्रियेत सर्जनशीलता वाढवण्यासाठी नावीन्यपूर्ण शिक्षण कसे तयार करावे'' या विषयावरील प्राध्यापक विकास कार्यक्रमाचे (FDP) चे आयोजन केले.





३० जानेवारी : डॉ. स्मिता जपे यांना ABDC सूचिबद्ध नियतकालिक इंडियन जर्नल ऑफ फायनान्स अँड बँकिंग द्वारे ''एम अँड ए  टेम्पो ऑन शेअर प्राईस ड्युअरिंग फर्स्ट ॲण्ड सबसिक्वेंट फायनल डील अनाऊंसमेंट'' या शोधनिबंधाचे समीक्षण करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले.

डॉ. नीतिन जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. व्ही. एन. ब्रिम्सला एच पी इ (HPE) कडून सल्लासेवा संधी  मिळाली.

•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.